नाताळ निमित्त आपणांस सर्वांना हार्दिक शुभेच्छा.!

# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. MAHMAR 2023/84526

❑ वर्ष - १ ❑ अंक -२६५ ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि.२५ डिसेंबर २०२३ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## महाराष्ट्रात महायुतीला फटका?; मविआला मिळणार कौल, सर्व्हेच्या आकडेवारीनं धक्का

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

लोकसभा निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर एकीकडे भाजपा आणि काँग्रेससह सर्व राजकीय पक्षांची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. अलीकडेच झालेल्या ५ राज्यांच्या निवडणुकांमध्ये ३ राज्यात भाजपानं जबरदस्त यश पटकावलं. या विजयामुळे भाजपा नेत्यांमध्ये लोकसभा निवडणुकीत विजय मिळणार आणि पुन्हा एकदा पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी विराजमान होतील असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपा विजयाची हॅट्रीक करेल असा दावा भाजपा नेते करत आहेत. तर दुसरीकडे २८ पक्षांच्या विरोधी इंडिया आघाडीनेही शड्डू ठोकत भाजपाचा पराभव होणारच असं म्हणत आहे. त्यामुळे पुढील लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडी की एनडीए यात कोण बाजी मारेल हा मोठा प्रश्न आहे. यात एबीपी या हिंदी वृत्तवाहिनीनं सी वोटरच्या माध्यमातून जनतेच्या मनातील कौल घेण्याचा प्रयत्न केला आहे. जर आज लोकसभा निवडणुका झाल्या तर त्यात कोणाचा विजय होईल आणि कुणाच्या पदरी निराशा येईल यावर देशातील ५ राज्यातील आकडे हैराण करणारे आहेत. या ५ राज्यात पंजाब, महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, बिहार आणि उत्तर प्रदेश यात एकूण २२३ लोकसभा जागा आहेत. या जागांवरून देशातील सत्ता



कोणाच्या हाती जाईल हे निश्चित होते.

लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात एकूण ४८ जागा आहेत. इथं काँग्रेस-उबाठा-राष्ट्रवादी यांच्या महाविकास आघाडीचा पगडा भारी असल्याचं दिसून येते. जर महाराष्ट्रात आज लोकसभा निवडणुका झाल्या तर सर्व्हेनुसार, इथं महायुतीला १९-२१ जागा तर महाविकास आघाडीला २६-२८ जागा आणि इतरांना ०-२ जागा मिळतील असा अंदाज आहे. तर मतांच्या टक्केवारीत महायुतीला ३७ टक्के, काँग्रेसला ४१ टक्के आणि अन्य २२ टक्के मते मिळतील असं बोलले जात आहे.

२०१९ नंतर महाराष्ट्राच्या राजकारणात बरीच उलथापालथ झाल्याचं दिसून आले. त्यात सुरुवातीला मुख्यमंत्रिपदावरून भाजपा-शिवसेना युती मोडली आणि राज्यात पहिल्यांदाच कट्टर विरोधी पक्ष असलेले शिवसेना-काँग्रेस-राष्ट्रवादी यांची महाविकास आघाडी बनली. महाराष्ट्रात महाविकास आघाडीचं सरकार स्थापन झाले. परंतु अवघ्या अडीच वर्षात शिवसेनेत मोठी फूट पडली. त्यानंतर एकनाथ शिंदेसह ४० आमदार भाजपासोबत गेले. त्यामुळे उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला.राज्यात पुन्हा भाजपा आघाडीचं सरकार आले. त्यानंतर अवघ्या वर्षभरातच शरद पवारांच्या राष्ट्रवादीतही मोठी फूट पडली. अजित पवारांसह ४३ आमदार सत्तेत महायुतीसोबत सहभागी झाले. त्यामुळे राज्यातील प्रमुख २ प्रादेशिक पक्षात पडलेल्या या फुटीमुळे राजकीय चित्रच पालटले. अशातच आता येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत महायुतीविरुद्ध महाविकास आघाडी अशी लढत असणार आहे. त्यात जास्तीत जास्त जागा मिळवण्यासाठी सगळेच पक्ष तयारी करत आहेत. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत कोण विजयी होईल हे निकालानंतरच स्पष्ट होईल.

## वंचित बहुजन आघाडीच्या सभास्थळी बॅकड्रॉप कोसळला



**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

कस्तुरचंद पार्क मैदानावर वंचित बहुजन आघाडीची स्त्री मुक्ती परिषद सभा सुरू असताना व्यासपीठाचा बॅक ड्रॉप लोखंडी अँगलसह मागच्या बाजूने कोसळला. सुदैवाने या घटनेत कोणीही जखमी झालेला नाही. मात्र संपूर्ण बॅकड्रॉप लोखंडी अँगल सह मागे कोसळल्यामुळे सभास्थानी काही काळासाठी खळबळ माजली होती.

विशेष म्हणजे जेव्हा हा बॅकड्रॉप कोसळला, तेव्हा प्रकाश आंबेडकर व्यासपीठावर यायचे होते. ते तिथे उपस्थित नव्हते. हजारोंच्या गर्दीत, सर्वांच्या उपस्थितीत बॅकड्रॉप कोसळल्यानंतर तिथे उपस्थित मीडियाकर्मी, फोटोग्राफर जेव्हा व्यासपीठाच्या मागे जाऊन घटनेचे फोटो घेण्याचे, चित्रीकरण करण्याचे प्रयत्न करत होते. तेव्हा वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी अरेरावी करत थांबवण्याचा, धक्काबुकी करण्याचा, कॅमेरा वर हात ठेवून चित्रीकरण होणार नाही असे प्रयत्न केले.

## यात्रा २.० मध्ये प्रियांका गांधी, राहुल गांधीं दिसणार रस्त्यावर
## भाऊ-बहिणीने एकत्रीतपणे सहभागी होण्याच्या प्रस्तावावर झाली चर्चा

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

उत्तर प्रदेश प्रभारी पदावरून मुक्त केल्यानंतर, आता काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी पदयात्रेमध्ये दिसू शकतात. भारत जोडो यात्रेच्या दुसऱ्या टप्प्याला जानेवारी २०२४ मध्ये सुरुवात होत आहे. पूर्वेकडून पश्चिमेकडे काढण्यात येणाऱ्या या यात्रेत राहुल आणि प्रियांका गांधी हे दोघेही रस्त्यावर दिसू शकतात. टीओआय ने सुत्रांच्या हवाल्याने दिलेल्या माहितीनुसार, मोठा प्रस्ताव असा आहे की राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांनी या योत्रेत सोबत चालावे. या



संदर्भात रणनीती आखणाऱ्या मंडळींनी यासंदर्भात विचारही केला आहे. पहिल्या टप्प्यात सप्टेंबर २०२२ ते जानेवारी २०२३ पर्यंत, अर्थात जवळपास १५० दिवस राहुल गांधी यांनी पदयात्रा केली होती.

यासंदर्भात बोलताना काँग्रेसच्या एका प्रमुख नेत्याने म्हटले आहे की, या संपूर्ण यात्रेदरम्यान या भाऊ-बहिणीने एकत्रीतपणे सहभागी होण्याच्या प्रस्तावावर चर्चा झाली आहे. मात्र अंतिम निर्णय अद्याप बाकी आहे. अनेक गोष्टींवर विचार करावा लागणार आहे. कारण लोकसभा निवडणूक तोंडावर आली आहे. राहुल गांधी तर नेते आहेतच. मात्र प्रियांका गांधी यांची महिला, तरुण वर्ग आणि ग्रामीण भागांतील लोकांमध्ये चांगली क्रेझ आहे, असे काँग्रेसचे मत आहे. महत्वाचे म्हणजे, दक्षिणेकडून उत्तरेकडे काढण्यात आलेल्या पहिल्या टप्प्यातील पदयात्रेतही, काही ठिकाणी प्रियांका गांधी राहुल गांधींसोबत दिसून आल्या होत्या.

सूत्रांचे म्हणणे आहे की, राहुल गांधींसोबत प्रियंका गांधी असल्यास, माजी काँग्रेसाध्यक्ष राहुल गांधी यांना निवडणूक कार्यक्रमांसाठी सहजपणे वेळ काढता येईल, हा सर्वात मोठा फायदा असेल.

### यावेळची यात्रा हायब्रिड मोडमध्ये असेल

नुकतेच काँग्रेस वर्किंग कमिटीने राहुल गांधी यांना यात्रा २.० काढावी असे म्हटले होते. मात्र, लोकसभा निवडणुका लक्षात घेत पुन्हा एकदा ४-५ महिने रस्त्यावर घालवीणे काचित योग्य ठरणार नाही, असेही पक्षाला वाटते. यामुळे काँग्रेस या यात्रेला हायब्रीड यात्रेचे स्वरूपही देऊ शकते. ही यात्रा काही शहरांमध्ये आणि राज्यांमध्ये पाई चालेल. तर उर्वरित यात्रा वाहनांतून पूर्ण केली जाईल.

## अजित पवारांच्या टीकेचा वार अन् अमोल कोल्हेंनी काढली बचावासाठी ढाल

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक पुणे**

परिस्थिती बदलली म्हणून खोटे बोलणे माझ्या तत्वात बसत नाही. अजित पवार, दिलीप वळसे पाटील यांनी माझ्या विजयासाठी मेहनत घेतली हे खरेच आहे. अजितदादा मोठे नेते आहेत. इतक्या मोठ्या नेत्याविषयी बोलायला मी फार लहान कार्यकर्ता आहे. ना मी राजकारणातला आहे, ना माझी राजकीय पार्श्वभूमी आहे. ना माझा कारखाना आहे, ना कुठली शिक्षणसंस्था आहे. त्यामुळे अशा मोठ्या नेत्यांनी बोलणे आणि त्यावर मी माझी प्रतिक्रिया देणे हे बातम्यांमध्ये येण्यासाठी मला पटत नाही.मला जी जबाबदारी दिलीय ती पार पाडणे महत्त्वाचे आहे. यापुढे शरद पवारांच्या नेतृत्वात शिरूर मतदारसंघाचे जे महत्त्वाचे प्रश्न आहेत ते मार्गी लावणे गरजेचे आहे. त्यामुळे दादांबद्दल माझ्यासारख्या कार्यकर्त्याने प्रतिक्रिया द्यावी हे पटत नाही असं विधान खासदार अमोल कोल्हे यांनी केले आहे.

अजित पवारांच्या टीकेवर अमोल कोल्हे यांनी हा बचावात्मक पवित्रा घेतला आहे. पुण्यात अजित पवारांनी माध्यमांशी बोलता कोल्हेंवर टीका केली होती. त्यावर अमोल कोल्हे यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, अजितदादांनी अनेक ठिकाणी भाषणात माझे कौतुक केले आहे. कदाचित त्यांना कुणी माहिती दिली असेल ती चुकीची असेल. त्यामुळे गैरसमजातून त्यांनी टीका केली असेल. मी मतदारसंघात काम केले नसते तर कोविडच्या काळात देशात ५ लाख इतके लसीकरण करणारा देशातील एकमेव मतदारसंघ आहे. इंद्रायणी मेडिसिटीसारखा



प्रोजेक्ट शिरूर मतदारसंघात मांडला. शिवसंकल्प सृष्टी प्रस्तावित आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या समाधीचा जिर्णोद्धाराला चालना मिळाली. ही चालना मिळण्यासाठी कोण कोण कारणीभूत आहे हे समोर ठेवावे. राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पातून आज ३० हजार कोटी प्रकल्प मतदारसंघात येतायेत. जर काहीच कामे मतदारसंघात झाली नसती तर हे काही झालेच नसते असं प्रत्युत्तर कोल्हेंनी दिले आहे.

तसेच निवडणूक हे केवळ माध्यम असते. आज राजकारणाकडे पाहताना साधन म्हणून पाहिले जाते. निवडणूक हे माध्यम आणि सत्ता हे साधन आहे. सत्ता येते, जाते, पदे येतात जातात आपण काम करणे महत्त्वाचे आहे. आपली तत्वे, मूल्ये, निष्ठा या सगळ्या गोष्टी एका जागी ठेऊन हे काम करणे मला गरजेचे वाटते. त्यानुसार शरद पवारांच्या मार्गदर्शनात मी काम करतोय. अजितदादा फार मोठे नेते आहेत. त्यांच्याबद्दल कुठलेही विधान करणे मला शोभणार नाही. त्यामुळे त्यांच्याबद्दल काही तर्क लावणे मला उचित वाटत नाही असं अमोल कोल्हे यांनी म्हटलं आहे.

## उद्धव ठाकरेंनी राम मंदिरासाठी एकनाथ शिंदेंच्या मार्फत एक कोटींची देणगी दिली : नितेश राणेंचा आरोप

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

राम मंदिरासाठी एक कोटी रुपयांची देणगी कुणी दिली? असा सवाल भाजप आमदार नितेश राणे यांनी उद्धव ठाकरेंना केला आहे. एकनाथ शिंदे यांच्या मार्फत उद्धव ठाकरेंनी राम मंदिरासाठी एक कोटींची देणगी दिल्याचा आरोप नितेश राणे यांनी आज केला. ते मुंबईत बोलत होते. यावेळी त्यांनी संजय राऊत यांच्या वक्तव्यांचाही समाचार घेतला. मिमिक्रीचे समर्थन करणारे म्याऊ म्याऊचे समर्थन करणार का? असे म्हणत नितेश राणेंचा संजय राऊत यांना उलट सवाल केला. ठाकरेंना फक्त निवडणुकांपूर्वी रामाची आठवण येते. चायनीज मॉडेल हिंदू म्हणत राणेंनी उद्धव ठाकरे आणि संजय राऊतांना टोला लगावला.

**संजय राऊतांवर हल्लाबोल**

संसदेमध्ये कलाकार असतात, असे म्हणत आमच्या उपराष्ट्रपतींचा अपमान करणाऱ्यांचा हे अप्रत्यक्षपणे समर्थन करत आहेत. तुम्हाला कोणाची मिमिक्री करणे, कोणाचा आवाज काढणे एवढेच समर्थन करत असाल. तर मालकाच्या मुलाला चालत असताना बघून म्याऊ म्याऊ चा आवाज काढला गेला, तेव्हा मालकाला एवढं का झोंबलं? मग त्या म्याऊ म्याऊ चं पण समर्थन करायला पाहिजे होतं. स्वतःच ठेवायचं झाकून आणि दुसऱ्याचं पाहायचं वाकून हे संजय राजाराम राऊत यांची घाणेरडी सवय झालेली आहे, अशी टीका नितेश राणे यांनी केली.

राम मंदिरासाठी देणगी सर्वात आधी उद्धव ठाकरेंनी दिली आम्ही ऐकलं की ती देणगी एकनाथ शिंदे यांच्याकडून घेऊन दिलेली आहे. हे खरं आहे की खोटं आहे. १ कोटी हे एकनाथ शिंदे यांचे आहेत की उद्धव ठाकरेंच्या खिशातले आहेत. याचे आधी उत्तर द्यावे मगच देणगी बाबत बोलावे, असे नितेश राणे म्हणाले.

## राज्यात आता पहिलीपासून कृषी विषय अभ्यासक्रमाचे धडे

**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

नवीन शिक्षण धोरणानुसार राज्यात शालेय अभ्यासक्रमात व्यापक बदल केले जात आहेत. देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा कृषी विषय आहे. यामुळे शेतीचे शास्त्रशुद्ध ज्ञान मुलांना लहानपणापासून दिले जाणार आहे. मुलांना शेतीचे ज्ञान झाल्यास ते व्यावहारिक शेती करू शकतात. यामुळे राज्यात पहिलीपासून कृषी विषय अभ्यासक्रमात शिकवण्यात येणार आहे. कृषी विषयासाठी नवीन मसुदा तयार झाला आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून शालेय अभ्यासक्रमात कृषी विषय असणार असल्याची माहिती शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी एका कार्यक्रमामध्ये बोलताना दिली. मुलांना मातृभाषेतून म्हणजेच मराठीमधून चांगले शिक्षण देण्याचा प्रयत्न आहे. शालेय शिक्षणात शेती अभ्यास शिकवण्यात येणार आहे. राज्यातील कमी पटसंख्या असलेल्या शाळांचे एकत्रिकरणाचा विचार असला तरी शाळा बंद करण्याचा सरकारचा विचार नाही. महाराष्ट्रातला एकही शिक्षक बेरोजगार होणार नाही. 'माझी शाळा सुंदर शाळा' हे अभियान मुख्यमंत्र्यांनी सुरु केले असल्याचे दीपक केसरकर यांनी सांगितले.

## आठ महिन्यानंतर अमरावतीत आढळला पहिला कोरोना रुग्ण : आरोग्य विभाग अलर्ट मोडवर

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

जिल्हत तब्बल आठ महिन्यानंतर एका कोरोनाग्रस्ताची नोंद झालेली आहे. कोरोना संक्रमित २१ वर्षीय तरुण हा सुपर स्पेशालिटी रुग्णालयात दाखल होता. त्याचा अहवाल शनिवारी पॉझिटिव्ह आल्याने जिल्ह्यात ५ मे २०२३ नंतर पहिल्यांदा कोरोना संक्रमितांची नोंद झालेली आहे. अचलपूर तालुक्यातील धामणगाव गडी तालुक्यातील हा रुग्ण आहे. अन्य आजारासाठी तो सुपर स्पेशालिटी रुग्णालयात दाखल होता. संक्रमितझाल्यानंतर त्याला जिल्हा सामान्य रुग्णालयात कोरोना रुग्णांसाठी असलेल्या १०नंबरच्या वार्डात उपचारार्थ ठेवण्यात आलेले आहे.त्याची प्रवासाची पार्श्रभूमी नसली तरी त्यांच्यासंपर्कातील लोकांचे नमुने घेण्यात येणार आहे. त्यालाकोरोनाची फारसी लक्षणे नसल्याची माहिती आरोग्यविभागाने दिली. जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेमार्फत




नऊ नमुने येथील लॅब मध्ये तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यामध्ये एक कोरोना पॉझिटिव्ह नोंदविला आहे. हे नमुने आता जिनोम सिक्वेसिंगसाठी पुणे येथील लॅब मध्ये पाठविण्यात आले आहे. त्यानंतर हा कोणता व्हेरिएंट आहे, याची माहिती मिळेल. सध्या दमा, श्वसनाचा व इतर आजार असलेल्या रुग्णांचे नमुने तपासणी वाढविण्यात आली आहे. नागरिकांनी गर्दीच्या ठिकाणी खबरदारी घेण्याचे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक यांनी केले आहे.

**महाराष्ट्रातही बाधितांची संख्या चिंताजनक**

करोनाबाधितांची संख्या आता पुन्हा झपाट्याने वाढताना दिसतेय. तसंच, करोनाचा उपप्रकार असलेल्या JN.1 चा प्रसार वेगाने होतोय. केरळमध्ये या विषाणूचा संसर्ग झालेला पहिला रुग्ण सापडला होता. आता जवळपास सहा राज्यात या विषाणूने शिरकाव केला आहे. यामध्ये महाराष्ट्राचाही समावेश आहे.महाराष्ट्रातील बाधितांची संख्याही चिंताजनक आहे.देशात सध्या ३ हजार ७४२ सक्रिय करोना रुग्ण आहेत. २४ डिसेंबर रोजी देशातील सहा राज्यांत ६३ रुग्ण JN.1 चे रुग्ण सापडले आहेत. यापैकी गोव्यात ३४, महाराष्ट्रात ९, कर्नाटकात ८, केरळात ६, तामिळनाडूमध्ये ४ तामिळनाडू आणि २ तेलंगणात सापडले आहेत.

संपादकीय ......

# अधिवेशन विदर्भात, चर्चा मुंबईची!

महाराष्ट्र राज्याची उपराजधानी असलेल्या नागपूरमध्ये राज्य विधिमंडळाचे एका वर्षातून किमान एक अधिवेशन तरी भरवण्याचे १९५३ साली झालेल्या नागपूर करारातून निश्चित करण्यात आले होते आणि मग त्यानुसार १९५६ पासून ते आजतागायत प्रतिवर्षी एक तरी अधिवेशन हे नागपूर करारानुसार राज्याची उपराजधानी असलेल्या नागपूरमध्ये आयोजित करण्यात येते. नागपूरमध्ये सर्वसाधारणपणे हिवाळी अधिवेशन अर्थात शीतकालीन सत्र हे विधिमंडळातर्फे आयोजित केले जाते. विधिमंडळाचे अधिवेशन नागपूरमध्ये घेण्याचे प्रमुख प्रयोजन म्हणजे विदर्भातील प्रश्न, येथील समस्यांना या अधिवेशनात प्राधान्य दिले जावे. विदर्भातील प्रश्नांवर विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये सखोल साधकबाधक चर्चा घडवून यावी आणि या चर्चेतून विदर्भातील जनतेच्या प्रश्नांना न्याय मिळावा ही या अधिवेशनामागची प्रमुख भूमिका आहे.यंदाचे विधिमंडळाचे नागपूर अधिवेशन हे कागदोपत्री जरी तीन आठवड्यांचे झाले असले तरी

प्रत्यक्षात अधिवेशनाचे कामकाज हे दहा दिवसांचे झाले आहे. त्यामध्येही पहिल्या आठवड्यात दोन दिवस कामकाज झाले. दुसरा आठवड्यात पाच दिवस झाले आणि शेवटच्या अंतिम आठवड्यात तीन दिवस कामकाज झाले. त्यामुळे प्रत्यक्षात तीन आठवडे म्हणजे जे १५ दिवस कामकाज होणे अपेक्षित होते तसे ते झालेलेच नाही. त्याचप्रमाणे नागपूर अधिवेशन म्हटले की विदर्भातील प्रश्न, विदर्भातील चर्चा यांना या अधिवेशनामध्ये अधिक प्राधान्य मिळणे अपेक्षित होते.

मात्र दुर्दैवाने सत्ताधाऱ्यांनी विदर्भातील प्रश्नांच्या चर्चेबाबत विरोधकांकडे बोट दाखवले, तर विरोधकांनी सत्ताधाऱ्यांच्या माथी याचे खापर फोडत विदर्भावरील चर्चेतून स्वत: वे अंग झटकून घेतले,मात्र यामुळे सत्ताधारी आणि विरोधक यांच्या शह-काटशहाचे राजकीय खेळामध्ये प्रत्यक्षात विदर्भातील प्रश्नांवर या अधिवेशनात कोणतीही साधकबाधक चर्चाच होऊ शकली नाही हे अत्यंत दुर्दैवी म्हणावे लागेल. याचा जर दोष कोणाला द्यायचा झाला तर तो विदर्भामध्ये सर्वाधिक जागा जिंकणाऱ्या भाजप आणि त्यापाठोपाठ काँग्रेस या दोन्ही राष्ट्रीय पक्षांनाच द्यावा लागेल. कारण या दोन्ही पक्षांनाच या भागातून मोठ्या प्रमाणावर विदर्भातील जनता निवडून देत असते.या अधिवेशनामध्ये ज्यावर प्रामुख्याने चर्चा झाल्या ते विशेष लक्षात घेतले तर मुंबई महापालिकेतील भ्रष्टाचार यावर सत्ताधारी सदस्य अक्षरशः तुटून पडले होते, तर दुसरीकडे दिशा सालियनच्या मृत्यू प्रकरणाची एसआयटी चौकशी करण्यासाठी सत्ताधारी विशेषत: भाजपचे सदस्य अत्यंत आक्रमक झाले होते. यामध्ये जे कोणी दोषी असतील त्यांना शिक्षा अवश्य व्हावी, तथापि सत्ताधाऱ्यांची हीच तळमळ जर विदर्भातील प्रश्नांना न्याय देताना दिसली असती तर विदर्भातील जनतेला थोडाफार तरी दिलासा मिळाला असता. अधिवेशन काळात नागपूरमध्ये विविध समाज घटकांचे, सामाजिक संघटनांचे शंभरहून अधिक मोर्चे विधिमंडळावर धडकले होते. या शंभराहून अधिक मोर्चेकऱ्यांपैकी किती प्रश्नांना सरकारने न्याय दिला याचाही विचार विदर्भातील स्थानिक जनतेच्या दृष्टीने होणे आवश्यक आहे.त्यामुळे एकूणच विदर्भ अधिवेशनाचा विदर्भातील जनतेच्या दृष्टीने प्रामुख्याने विचार करायचा झाल्यास विदर्भाच्या जनतेला असे काही पदरात पडलेले दिसून येत नाही आणि विदर्भातील जनतेच्या दृष्टीने विचार करायचा झाल्यास याची जबाबदारी केवळ सत्ताधारी राजकीय पक्षांवर नसून विरोधकांवर याची जबाबदारी अधिक आहे, असे म्हटल्यास नवल वाटू नये, कारण सभागृहातील चर्चेच्या माध्यमातून विदर्भातील प्रमुख समस्यांची चर्चा घडवून आणून त्याद्वारे त्या सोडवण्याची संधी विरोधकांकडे होती, मात्र विजय वडेट्टीवार यांच्यासारखे आक्रमक, कणखर आणि अभ्यासू विधानसभा विरोधी पक्षनेते असतानादेखील विदर्भाच्या प्रश्नांना सभागृहात वाचा फुटू शकली नाही हे कटू सत्य काँग्रेसलादेखील स्वीकारावे लागेल.

# धामणगावचा तरुण कोरोनाग्रस्त

## आठ महिन्यांत पहिल्या रुग्णाची नोंद

### नऊ नमुने तपासले

■ टेस्टिंग वाढविण्याच्या सूचना आरोग्य विभागाला दिल्या आहेत. नागरिकांनी दक्षता घ्यावी, संभाव्य तयारीच्या अनुषंगाने आरोग्य विभागाचे मॉकड्रील करण्यात आले आहे.

**– सौरभ कटियार, जिल्हाधिकारी**

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक धामणगाव रेल्वे** अमरावती जिल्ह्यात तब्बल आठ महिन्यानंतर एका कोरोना ग्रस्ताची नोंद झालेली आहे. २१ वर्षीय तरुण येथील सुपर स्पेशालिटी रुग्णालयात दाखल होता. त्याचा अहवाल शनिवारी पॉझिटिव्ह आल्याने जिल्ह्यात ५ मे २०२३ नंतर पहिल्यांदा कोरोना संक्रमितांची नोंद झालेली आहे. धामणगाव तालुक्यातील हा रुग्ण आहे. अन्य आजारासाठी तो सुपरमध्ये दाखल होता. संक्रमित




झाल्यानंतर त्याला कोरोना रुग्णांसाठी असलेल्या १० नंबरच्या वॉर्डात उपचारार्थ ठेवण्यात आलेले आहे. त्याची प्रवासाची पार्श्वभूमी नसली तरी त्यांच्या संपर्कातील लोकांचे नमुने घेण्यात येणार आहे. त्याला कोरोनाची फारसी लक्षणे नसल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली.जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेमार्फत नऊ नमुने तपासणीला पाठविण्यात आले होते. त्यामध्ये एक पॉझिटिव्ह नोंदविला आहे. हा नमुना आता जिनोम सिक्वेसिंगसाठी पाठविण्यात येणार आहे. त्यानंतर हा कोणता व्हेरिएंट आहे, याची माहिती मिळेल, अशी माहिती विद्यापीठ लॅबचे समन्वयक डॉ. प्रशांत ठाकरे यांनी सांगितले.

# वन विभागातील ‘टॉप अप’ मॉडेलमध्ये प्रचंड त्रुटी

## ‘टॉप टू बॉटम’ वनकर्मचाऱ्यांमध्ये अभिसरण योजनेला विरोध

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

वने आणि वन्यजीव संरक्षणाच्या कामात मग्रारोहयो-अभिसरण योजना आणण्याचा घाट रचला असताना या योजनेस प्रचंड विरोध होत आहे. त्यामुळे नेमण्यात आलेल्या समितीने ‘टॉप अप’ मॉडेलमध्ये प्रचंड त्रुटी काढल्या असून समितीचा अहवाल राज्याचे वनबल प्रमुख शैलेश टेंभुर्णीकर यांनी राज्य शासनाकडे सादर केला आहे. त्यामुळे आता शासन कोणता निर्णय घेते, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

वन्यजीव संरक्षण संवर्धनाच्या कामामध्ये




मग्रारोहयो योजना अशी सरमिसळ करून अभिसरण (टॉप अप) प्रकारची नवीन योजना वन विभागाच्या प्रधान सचिवांनी वन विभागात तात्काळ राबविण्याचे निर्देश दिले होते. वास्तविकत: वन विभागाच्या अधिकाऱ्यांचे मत लक्षात न घेता सरसकट टॉप अप राबविण्यावर जोर दिल्यानंतर या योजनेला ‘टॉप टू बॉटम’ विरोध झाला.वन विभागातील कनिष्ठ- वरिष्ठ वनाधिकारी आमने-सामने आल्याचे चित्र निर्माण झाल्यानंतर वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी ‘टॉप अप’ मॉडेलचा सर्वंकष अभ्यास करण्यासाठी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक पी. कल्याणकुमार यांच्या अध्यक्षतेत १२ सदस्यांची एक समिती नियुक्त केली होती. या समितीने आठवड्याभरात अभ्यास करून अहवाल वनबल प्रमुख शैलेश टेंभुर्णीकर यांच्यामार्फत शासनास सादर केला आहे.

# न्यू हायस्कूल मेन शाळेची शताब्दी : एक अपूर्व योग

अमरावती शहराला फार मोठे ऐतिहासिक वैभव आहे कारण पश्चिम विदर्भातील हे गाव जुन्या काळापासून एक सांस्कृतिक व शैक्षणिक केंद्र आहे. अनेक थोरामोठ्यांच्या कर्तृत्वाला या ठिकाणी धुमारे फुटलेले आपण बघितलेले आहेत. या सबंध ऐतिहासिक व सामाजिक प्रवासामधे एका शाळेचा उल्लेख कायम केला जातो ती म्हणजे न्यू हायस्कूल मेन. स्वातंत्र्यपूर्व काळात कै. दादासाहेब खापर्डे यांनी या शाळेची स्थापना राष्ट्रीय विचारांना रुजविण्यासाठी केली. स्वातंत्र्योत्तर काळात देखील या शाळेचे वैभव तसेच राहीले. अमरावती शहरातील अनेक पिढ्या या शाळेत शिकून तयार झाल्या. पोलीस महासंचालक, मुख्यमंत्री, अर्थमंत्री, पद्मश्री प्राप्त मान्यवर, मोठ्या शिक्षण संस्थेचे सचिव, आमदार, खासदार, प्राचार्य, नामवंत व्यावसायीक असल्या वेगवेगळ्या समाजिक स्तरांमधे नावलौकिक प्राप्त केलेली अनेक मंडळी या शाळेतूनच तयार झाली. सामाजिक योगदान देऊन समाज उन्नत करण्याचे प्रारंभिक धडे त्यांना याच शाळेत मिळाले. म्हणूनच न्यू हायस्कूल मेन या शाळेचे अतिशय आगळे वेगळे स्थान अमरावती शहराच्या सामाजिक जडण घडणीमधे आहे. अश्या या प्रतिष्ठीत शाळेचा दैदिप्यमान प्रवास एका अत्यंत महत्वाच्या टप्प्यावर पोहोचतो आहे. पुढील वर्ष, सन २०२४ म्हणजे शाळेचे शताब्दी वर्ष म्हणून साजरे केले जाते आहे. या निमित्ताने शाळेमधून शिकून व संस्कारित होऊन सामाजात मोठे योगदान देणाऱ्या सर्व माजी विद्यार्थ्यांना शाळेमधे परत एकदा बोलाविले जाणार आहे. शाळेतील सध्याच्या मुख्याध्यापिका व शिक्षकांनी यासंबंधीची एक अभूतपूर्व योजना आखली आहे ज्या द्वारे शताब्दी वर्षानिमित्त शाळेचा व शाळेतून शिकून गेलेल्या विद्यार्थ्यांचा स्नेहबंध पुन्हा नव्याने साधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या संपुर्ण शताब्दी वर्षाचा उद्घाटन समारंभ येत्या २७ जानेवारी रोजी होणार आहे. त्यासोबतच दि. २८ तारखेला सर्व माजी विद्यार्थ्यांचा एक भव्य मेळावा देखील आयोजित होणार आहे. यामधे माजी विद्यार्थ्यांना सहभागी होण्याचे निमंत्रण दिले जात आहे. या मेळाव्याकरीता तसेच वर्षभर



जे शताब्दी निमित्त कार्यक्रम राबविले जाणार आहेत त्याकरिता शाळेच्या माध्यमातून भरपूर प्रयत्न केले जात आहेत. यासाठी वेगवेगळ्या बॅचेसचे ग्रुप तयार करून सर्व माजी विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतले जात आहे. या प्रसंगाचे औचित्य म्हणून या प्रसंगी एक स्मरणिका देखील प्रकाशित केली जाणार आहे. त्याकरीता सुद्धा लेख, कविता व आठवणी पाठविण्याचे आवाहन या स्मरणिका समितीच्या माध्यमातून केले गेले आहे.

**डॉ. अविनाश मोहरील**
**मो.९४२३१२३९०६**

शताब्दीच्या निमित्ताने शाळेला सर्वच दृष्टीने गतवैभव प्राप्त व्हावे याकरीता काही माजी विद्यार्थ्यांनी संकल्प केला आहे. इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या झंझावातामधे मराठी माध्यमांच्या शाळा टिकविणे सध्या जिकरीचे झाले आहे. परंतू आता नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने परत एकदा मातृभाषेतून शिक्षण दिले जावे याकरीता भर दिला जाणार आहे. म्हणूनच त्या दृष्टीने शाळेमधे सध्याच्या व भविष्यातील विद्यार्थ्यांना काही सुविधा मिळणे गरजेचे आहे. ही निकड लक्षात घेऊन शाळेच्या शताब्दी वर्षाचे निमित्त साधून जुन्या काही बॅचेसच्या विद्यार्थ्यांनी शाळेच्या मुख्याध्यापिका व शिक्षकांशी बोलून मोठ्या प्रमाणात मदत करण्याचे ठरविले आहे. यामधे काही महत्वाचे प्रकल्प जसे, शाळेतील प्रयोगशाळा अद्ययावत करणे, शाळेमधे एक मोठा सेमीनार हॉल तयार करणे, सोलर एनर्जीचा स्रोत उपलब्ध करून देणे, शाळेत नवे फर्नीचर देणे, विद्यार्थ्यांची ने-आण करण्याकरीता व्हॅन व बस यांचा समावेश आहे. माजी विद्यार्थ्यांच्या विविध समुहांतून या सर्व सुविधा उभारण्याच्या दृष्टीने प्रचंड उत्साह दिसतो आहे. शताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने शाळेची पालक संस्था नूतन विदर्भ शिक्षण मंडळाच्या कार्यकारिणीने देखील पुढाकार घेतला आहे. संस्थेने मोठा खर्च करून शाळेची संपुर्ण रंगरंगोटी व काही दुरुस्ती करून घेतली आहे. शाळेचे नवे स्वरुप सर्वांनाच आवडते आहे. यासोबतच कार्यकारिणी सदस्यांनी व्यक्तीगत पातळीवर मदत केली असून एकूण १,५०,००० रुपये रक्कम शताब्दी महोत्सवाकरीता शाळेच्या मुख्याध्यापकांनी निर्माण केलेल्या खात्यामधे जमा केली आहे. यासोबत, शाळेच्या माजी व विद्यमान शिक्षकांनी देखील



२,५०,००० रुपयांचे योगदान दिलेले आहे. माजी विद्यार्थ्यांकडून देखील भरघोस योगदान दिले जात आहे. सध्या शाळेमधे वेगवेगळ्या बॅचेसच्या सभा आयोजित होत असून बॅचनुसार शाळेच्या वर उल्लेखित प्रकल्पांकरीता निधी संकलन करण्याचे काम माजी विद्यार्थी फारच उत्साहात करीत आहेत. यामधे शाळेप्रती असलेले प्रेम व आदरभाव वाखाणण्यासारखा आहे. ज्या शाळेने मला उच्च दर्जाचे शिक्षण दिले व मला समाजात सन्मानाने जगण्याची क्षमता दिली त्या शाळेच्या विकासात्मक वाटचाली करीता तसेच त्या शाळेचे गतवैभव पुन्हा एकदा प्राप्त करून देण्याकरिता माझे योगदान असलेच पाहिजे ही भावना या सर्व माजी विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झाली आहे. त्यामुळेच या सबंध प्रक्रीयेला भरभरून प्रतिसाद लाभत आहे. एकंदरीत अमरावतीच्या शैक्षणिक इतिहासामधे एक महत्वाचे स्थान असलेली शाळा म्हणजे न्यू हायस्कूल मेन व या शाळेच्या पुढील वर्षी होणाऱ्या शताब्दी वर्षानिमित्त माजी विद्यार्थ्यांचा प्रचंड उत्साह व सहभाग हा एक अपूर्व योग सध्या अमरावती शहरात चर्चीला जातो आहे.




# झोपताना मोबाईल जवळ ठेवता, तर व्हा सावध...

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक**

झोपताना मोबाईल किती दूर ठेवावा हे बहुतेकांना माहीत नसते. जे लोकं मोबाईल जवळ ठेवून झोपतात, त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. डब्ल्यूएचओनेही याबाबत इशारा दिला आहे. आजकाल मोबाईल हा प्रत्येकाच्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे.



लोकांना मोबाईलचे इतके व्यसन लागले आहे की सकाळी उठल्याबरोबर फोन हवाच असं प्रत्येकाला वाटतं.

एवढेच नाही तर जेवताना आणि झोपतानाही लोकं फोन सोडत नाहीत. यालाच मोबाईलचे व्यसन म्हणणे चुकीचे ठरणार नाही. मात्र ही परिस्थिती अत्यंत धोकादायक असून आता सावध राहण्याची वेळ आली आहे. काही लोकांना मोबाईल उशीखाली ठेवून झोपण्याची सवय असते. ही अत्यंत धोकादायक बाब आहे. तसेच रात्रभर झोपताना मोबाईल जवळ ठेवल्यास पुढील समस्या तुम्हाला होऊ शकतात.

■ जर तुम्हीही अनेकदा फोन उशीखाली ठेवून झोपत असाल तर ही सवय तुम्हाला मोठ्या अडचणीत आणू शकते.

■ तसेच मोबाईल रात्रभर उशीजवळ ठेवल्यामुळे वारंवार डोकेदुखी, अधूनमधून डोक्यात व्हायब्रेशन होणे आणि त्यामुळे येणारी निराशा यासोबतच कमी काम करूनही सतत थकवा जाणवणे, हालचाल करताना विनाकारण चक्कर येणे.

■ मोबाईलमुळे तासनतास प्रयत्न करूनही गाढ झोप न लागणे, डोळ्यांत कोरडेपणा येणे, कोणत्याही कामात लक्ष न लागणे या समस्या होऊ शकतात.

■ शारीरिक कामात मन न लागणे, कानात आवाज वाजल्यासारखे वाटणे, बोलतांना अगदी जवळ बसूनही एखादे वाक्य नीट ऐकू न येण.

■ रात्री जोपताना मोबाईल जवळ असल्यास स्मरणशक्ती कमी होणे, पचनसंस्थेमध्ये अडथळे येणे, हृदयाचे ठोके अनियमित होणे हे त्रास कालांतराने होऊ शकतात.

■ एवढेच नाही तर रात्रभर मोबाईल जवळ ठेवल्यास त्वचेच्या अनेक समस्या तुम्हाला होऊ शकतात.

■ अकाली सुरकुत्या, त्वचेची जळजळ, अगदी खाज सुटण्याच्या समस्या देखील डोक्याखाली मोबाईल ठेवल्यामुळे होऊ शकतात.-

# दापोरी येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ५५ व्या पुण्यतिथी महोत्सवास सुरुवात!

## ह भ प ग्रामगीताचार्य रायजीप्रभु शेलोटकर महाराज यांच्या अमृतवाणीतून ग्रामगीता प्रवाचनास सुरुवात !

**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताकमोर्शी –** मोर्शी तालुक्यातील दापोरी येथे मानवतेचे महान पुजारी वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा ५५ वा पुण्यतिथी महोत्सव व सर्व संत यांच्या स्मृती दिनानिमित्य संगीतमय ग्रामगीता प्रवचन ह भ प ग्रामगीताचार्य रायजीप्रभु शेलोटकर महाराज यांच्या मधुर वाणीतून मोठ्या उत्साहात संत्पन्न होत आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबांनी आजन्म सेवा करीत भारताच्या विश्वमानवाच्या सुख समृद्धी उद्धारासाठी अविरत परिश्रम घेतले , शुद्ध त्यागमय बंधुत्वाचा अमृतमूल्य बोध दिला, एकात्मता, विश्व बंधुत्व, विश्वशांती, अंधश्रद्धा, सामुदायिक प्रार्थना, रामधून, हि महान साधना बनवून ग्रामवासीयांना जागृत केले हे सर्वश्रुतच आहे आज काळाचे गरजेनुसार वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या आचार विचारांची आचरणाची अत्यंत



गरज आहे, त्यामुळे दापोरी नगरीमध्ये पुण्यतिथी महोत्सवाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या पुण्यतिथी महोत्सवामध्ये सामुदायिक द्यान, प्रबोधन, स्वच्छता अभियान, रांगोळी स्पर्धा, विवीध विषयांवर व्याख्यान, सत्संग, भजन, व्यसनमुक्ती, यासह विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून ३१ तारखेला दापोरी नगरी मध्ये हजारो भाविकांच्या उपस्थितीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या प्रतिमेची भव्य शोभायात्रा निघणार असून काल्याचे कीर्तन ग्रामगीताचार्य श्री रायजीप्रभु शेलोटकर यांच्या हस्ते होणार आहे. या पुण्यतिथी महोत्सवा मध्ये विविध उपक्रम राबविले जाणार असून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या स्मृती महोत्सवा मध्ये सहभागी होण्याचे आवाहन दापोरी गुरुदेव सेवा मंडळातर्फे करण्यात आले असून पुण्यतिथी महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्याकरिता दापोरी येथील युवक व गावकरी मंडळी अथक परिश्रम घेत आहे.

# २८ डिसेंबरपासून शहरात ड्रंकन ड्राईव्ह मोहिम, चार सरप्राईज पथक नियुक्त

**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** मद्यधुंद अवस्थेत रात्री शहरात धुमस्टाईलबाईकने फिरायच्या बेतात असाल, तर आधीच सावध व्हा, अन्यथा तुमची थर्टीफस्ट लॉकअपमध्ये होईल. कारण, शहर वाहतूक पोलिस २८ डिसेंबरपासूनच शहरात ड्रंकन ड्राईव्ह मोहिम राबविणार आहे.

थर्टीफस्ट म्हटलं की मस्तवाल तरूण असो की, मोठे... दारू पिण आणि उशिरा रात्रीपर्यंत शहरात फिरणाऱ्या मस्तवालांची काही कमी नाही. अशांमुळेच भांडण-तंटा, अपघात, राडा होऊन पोलिसांचा ताप वाढतो. म्हणून यंदाचा थर्टीफस्ट शांततेत पार पाडण्यासाठी यापूर्वीच पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी दोन दिवसांपूर्वी सर्व ठाणेदारांची बैठक घेऊन त्यांना सूचना दिल्या. याचाच एक भाग म्हणून वाहतूक पूर्व व पश्चिम विभाग



शहरात २८ डिसेंबरपासूनच शहरात ड्रंकन ड्राईव्ह मोहिम राबविणारआहे. शहरातील प्रमुख चौकांमध्ये ही मोहिम होईलच. पण त्यासोबतचकोणत्याही ठिकाणी

### फटाके फोडणारी बुलेट गॅंगही रडारवर

बुलेटला महागडे सायलेन्सर लाऊन भरधाव वेगाने रस्त्यावर अचानक चित्र-विचित्र कर्कश आवाज काढणारी बुलेट गैंग सुध्दा पोलिसांच्या रडारवर आहे. तसेच अचानक सुतळी बॉम्बसारखा फटाक्याचा आवाज काढणारे बुलेटस्वारांवर पोलिसांची बिशेष नजर असणार आहे.

सरप्राईज मोहिम राबविणारी चार पथके सुध्दा तयार करण्यात आली आहे. ब्रिथ ॲनेलाईझरमध्येदुचाकीस्वाराचीदारूची मात्रा आढळली की त्याच्यावर कारवाई करून त्याला लॉकअपमध्ये घालण्यात येईल. अशांची थर्टीफस्टची रात्र आणि नववर्षाचा पहिली सकाळ लॉकअपमध्ये होईल.

### ६ महिन्यात १३९ मद्यपींवर कारवाई

वाहतूक पूर्व व पश्चिम विभागाने आपआपल्या हद्दीमध्ये गेल्या ११ महिन्यात १३९ दुचाकीस्वारांवर ड्रंकन ड्राईव्हची कारवाई केली आहे. ३१ डिसेंबरपर्यंत दोन्ही विभागामिळून कारवाईची डबल सेंच्यूरी होणार असल्याचा अंदाज पोलीस ढ वर्तुळात वर्तविण्यात येत आहे.

### रात्रभर ३०० पोलिस राहणार ऑनरोड

थर्टीफस्टची रात्र शांततेत पार पाडण्यासाठी की आयुक्तालयातील दहाही पोलीस ठाण्याच्या हद्दीत वरिष्ठ- त कनिष्ठ अधिकाऱ्यांसह सुमारे ३०० पेक्षा जास्त पोलिसांचा नी ताफा ऑनरोड राहणार आहे. यासह गस्त घालणारी वाहने, दामिनी व्हॅन सुध्दा गस्तीवर राहतील.

# कारणबाग शेतशिवारात बिबट्याची दहशत

## अनेक शेतकऱ्यांना दर्शन, वनविभागाचे पथक रवाना

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक अचलपूर** गेल्या तीन दिवसापासून शेतशिवारात काम करणार्या शेतकर्यांना बिबट्या सदृश्य प्राणी दिसत होता; परंतु शुक्रवारी व शनिवारी सकाळी ४ शेतकर्यांना एकाच वेळी बिबट्याने दर्शन दिल्याने तो बिबट्या असल्याचे स्पष्ट झाले असून तहसील व वन विभागाला माहिती देण्यात आली.

प्राप्त माहितीनुसार, अचलपूर शहराला लागून असलेल्या कारणबाग शेत शिवारात शनिवारी सकाळी सातच्या सुमारास बिबट्याने शेतावर काम करीत असलेल्या शेतकर्यांजवळून पळ काढल . अंकुश झाडे, रा. माळीपुरा, अचलपूर हे आपल्या संत्र्याच्या शेतात गेले असता त्यांच्या समोरून एक प्राणी धूम ठोकताना दिसला. त्यांनी आरडाओरड केली असता त्यांच्या शेताला लागून असलेल्या चांडक यांच्या शेतात काम करीत असलेल्या नदीम नावाच्या इसमाला पण तो पळतांना दिसला. त्यांनी लगेच चार-पाच शेतकर्यांना आरडाओरडा करीत बोलावले असता तो गुरुकुल पब्लिक

### पथक पाठविले आहे

शुक्रवारीच आमचे कर्मचारी त्या भागात जाऊन आले. आज परत माहिती मिळताच प्रशांत उमक यांच्या नेतृत्वात एक पथक त्या भागात पगमार्क व खुणा तपासत आहे. शेतकरी व मजुरांनी दक्षता घ्यावी.

**–एच. जी. वाळके** वन परिक्षेत्र अधिकारी, परतवाडा

स्कूलच्या मागे असलेल्या बिच्छन नदीच्या पात्रातील झुडपात उतरला.

पाहता पाहता ही बातमी वार्यासारखी परिसरात पसरली. सकाळी शेतात असणारे मजूर व शेतकरी शोधत असताना परत तो हयदाचा नाला असलेल्या भागात पळून जातांना दिसला. लगेच शेतकर्यांनी वन विभागाच्या अधिकार्यांना फोन वरून माहिती दिली, तसेच संबंधित तलाठ्याला फोन केला. त्यांनी तहसीलदारांना सांग असे सांगितल्यावर तहसीलदारांना फोन लावण्यात आला.

स्थानिक गुरुकुल पब्लिक स्कूल, सेतुकबाग हनुमान मंदिर व कुटीर रुग्णालयाच्या मागील भागात दोन दिवस आधी जयदेव जुनघरे हा इसम शेतात जात असताना त्यांना बिबट्या दिसला; परंतु त्यांनी इतर लोकांना सांगितले असता तुम्हाला भास झाला असेल असे लोक



म्हणाले. परंतु शनिवारी कुटीर रुग्णालयाच्या मागील भागात असलेल्या मिलिंद झाडे यांच्या शेतात काम करणार्या शेतमजुरांना देखील बिबट्या दिसला. यावेळी अनेकांनी जवळून दिसल्याने बिबटच असल्याचे खात्रीपूर्वक सांगितले. या भागात नवीन वसाहत तसेच मोठी झोपडपट्टी असल्याने भीतीचे वातवरण निर्माण झाले आहे.

# कृषी आयुक्तांची फटकार, बारगावचे कृषी सहायक निलंबित

## संत्रा प्रक्रियासह एफपीओंच्या उद्योगाला भेटी





**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती : –** राज्याचे कृषी आयुक्त प्रवीण गेडाम यांनी गुरुवारी संत्रा प्रक्रिया उद्योगासह एफपीओंच्या उद्योगाला भेटी दिल्या. यादरम्यान बारगाव (ता. वरूड) येथील शेतकऱ्यांशी संवाद साधत असताना स्थानिक कृषी सहायकाबाबत तक्रारी जास्त होत्या. त्यामुळे गेडाम यांनी विभागीय कृषी सहसंचालकांना सदर कृषी सहायकाच्या निलंबनाचे आदेश दिले.

संबंधित कृषी सहायक मुख्यालयी राहत नाही व सहकार्य करीत नसल्याच्या शेतकऱ्यांच्या तक्रारी होत्या. याशिवाय कृषी आयुक्तांच्या दौऱ्यादरम्यान ते उपस्थित नव्हते, असे कृषी अधिकाऱ्यांनी सांगितले. कृषी आयुक्तांच्या निर्देशानुसार कृषी सहसंचालकांनी शुक्रवारी संबंधित कृषी सहायक विजय गावंडे यांच्या निलंबनाचे आदेश काढले आहे.

### कृषी सहयोग शेतकरी उत्पादक कंपनीला भेट

आसेगाव पूर्णा येथील कृषी सहयोग शेतकरी उत्पादक कंपनीला कृषी आयुक्तांनी भेट दिली. कंपनीचे स्थानिक पातळीवरील महत्त्व, फायदे याबाबत कंपनीचे संचालक नीलेश खोंडे संचालक यांनी माहिती दिली व पोकरामधून लाभ घेतलेल्या व स्मार्टमधून मंजूर झालेल्या बाबींबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी कृषीचे अधिकारी, कर्मचारी व शेतकरी उपस्थित होते.

चांदूरबाजार तालुक्यातील देवठाण- सालबर्डी येथील नव्या ऑरेंज प्रोसेसिंग प्रकल्पाला कृषी आयुक्तांनी भेट दिली व नव्या ऑरेंज प्रोसेसिंग प्रकल्पाच्या कामकाजाची माहिती जाणून घेतली. यावेळी विभागीय कृषी सहसंचालक किसनराव मुळे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते, आत्मा प्रकल्प संचालक अर्चना निस्ताने यांच्यासह कृषी विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

कलर बॉक्स

# इर्विन चौकात लागले सीसीटिव्ही कॅमेरे

## प्रमुख सर्व चौकांमध्ये लागणार, लोकसहभागाचे मॉडेल यशस्वी

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** लोकसहभागातून सर्व प्रथम शेगाव नाका चौकात सीसीटिव्ही कॅमेरे लागले होते. आता त्याच पद्धतीने शहरातला अत्यंत महत्त्वाचा चौक असलेल्या इर्विन चौकात कॅमेरे लागले आहे. पुढे सर्वच प्रमुख चौकांमध्ये लोकसहभागातून कॅमेरे लावण्याचा प्रयत्न पोलिसांचा आहे.

पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, उपायुक्त सागर पाटील यांनी शहरातील व्यस्त चौकांमध्ये कायदा व सुव्यवस्था तसेच वाहतुक नियमनाच्या दृष्टीने सीसीटिव्ही यंत्रणा लोकसहभागातून कार्यान्वीत करण्याची संकल्पना सुचविली होती. ती पुर्णत्वास नेण्याचे दृष्टीने सहायक पोलिस आयुक्त प्रशांत राजे, पोलिस निरीक्षक वाहतुक मनीष ठाकरे, संजय अढाऊ यांनी प्रयत्न सुरू केले. समाजाप्रती संवेदना व सजगता असलेल्या नागरिकांना पोनि. मनीष ठाकरे यांनी माहिती दिली. सदर संकल्पनेला सकारात्मक प्रतिसाद देवून १ डिसेंबरला पोलिस स्टेशन



गाडगेनगर जवळील शेगाव नाका चौकात चारही दिशेने देखरेख ठेवता येईल अशी सीसीटिव्ही यंत्रणा कार्यान्वीत करण्यात आली होती.

याच दरम्यान शहरातील इतर महत्त्वाच्या चौकांमध्ये सदर यंत्रणा कार्यान्वीत करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले होते. याच श्रृंखलेत आता डॉ. बाबासाहेब आंबेडकर ( इर्विन ) चौकात कॅमेरे लावण्यात आले आहे. त्यासाठी अबरार खत्री (बुरहानपुर जलेबीवाले) यांनी सहकार्य केले असून संपूर्ण खर्च त्यांनी केला आहे. सदर चौकात सीसीटिव्ही यंत्रणा कार्यान्वीत झाल्याने चारही दिशेने देखरेख ठेवणे पोलिसांसाठी शक्य होणार आहे.

नव्याने बसविण्यात आलेल्या सीसीटिव्ही यंत्रणेचा पोलिसांना कायदा व सुव्यवस्था राखणे तसेच वाहतुक नियमनासाठी उपयोग होणार आहे. पुढील काळात वाहतूक विभाग अमरावती शहरातील काही समाजसेवी संस्था व सामाजिक काम करणार्या सुजान नागरिकांच्या सहकार्याने पंचवटी चौक, बस स्थानक, राजकमल चौक या गर्दीच्या ठिकाणी क्रमश : सीसीटिव्ही यंत्रणा कार्यान्वीत करण्याचा प्रयत्न करणार आहे. सामाजीक संस्था व नागरिकांनी सामाजीक सुरक्षीततेच्या दृष्टीने पुढाकार घ्यावा, असे आवाहन वाहतूक विभागाने केले आहे.

# स्व. माणिकराव घवळे स्मृती राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेचे आयोजन

**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** स्व. माणिकराव घवळे स्मृती प्रतिष्ठान आणि डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. माणिकराव घवळे स्मृती राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा गुरुवार दि. ४ जानेवारी २०२४ रोजी आयोजित करण्यात आली आहे. यावर्षी आर्थिक निकषांवर आधारित आरक्षण देशहिताचे आहे या विषयावर ही स्पर्धा रंगणार आहे. ४ जानेवारी २०२४ रोजी डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाच्या सभागृहात सकाळी १०:३० वाजता ही स्पर्धा पार पडणार आहे. या स्पर्धेचे फेसबुक, युट्यूब च्या माध्यमातून थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे. स्पर्धेत विजेता संघाला स्व.माणिकराव घवळे स्मृती फिरता चषक प्रदान करण्यात येईल. विषयाच्या अनुकूल प्रतिकूल बाजूस मते मांडणाऱ्या दोन स्पर्धांचा संघ स्पर्धेसाठी पात्र ठरेल. स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविणाऱ्या विजेत्यास ११००१ रु. रोख,सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय ७००१ रु.रोख सन्मानचिन्ह व तृतीय पारितोषिक ५००१ रु. रोख सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र तसेच



प्रोत्साहनपर बक्षीस म्हणून २००१ रु व १५०१ रु रोख,सन्मानचिन्ह प्रदान करण्यात येणार आहे. या स्पर्धेचे हे २२ वे वर्ष असून, स्पर्धेच्या माध्यमातून महत्वपूर्ण विषयावर मत मांडण्याची संधी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना प्राप्त होणार आहे.

### आर्थिक निकषांवर आधारित आरक्षण देशहिताचे आहे.. या विषयावर होणार स्पर्धा

विदर्भ,मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र येथील नावाजलेले वादविवाद पटू या स्पर्धेचे परीक्षण करणार आहेत.ही स्पर्धा नि:शुल्क असून अधिकाधिक विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घ्यावा असे आवाहन प्राचार्य डॉ.वर्षा देशमुख ,संयोजक प्रफुल्ल घवळे व आयोजकांतर्फे करण्यात आले आहे. अधिक माहितीकरीता डॉ. शीतल तायडे, ९८२२५२७८०८, डॉ.अमित गावंडे ९४२२९४३२९८, प्रा.रणजित देशमुख ९९७५७७८१८ ,मयुर चौधरी ७७९८०६०५०० गौरव इंगळे ९४०३३८७७५२, रत्नाकर शिरसाट ८८५७९११०३६ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांच्यावतीने करण्यात आले.

# जिल्हाधिकारी पोहचले शेतकऱ्याच्या बांधावर

## चांदूरबाजार तालुक्याचा घेतला आढावा

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक चांदुर बाजार** जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी चांदूर बाजार तालुक्याला भेट देत शेतीच्या नुकसानीची पाहणी करून तालुक्यात सुरू असलेल्या विविध विकासकामांचा आढावा घेतला.

रिद्धपूर येथील विकासकामांचा आढावा घेतल्यानंतर भूमी अभिलेख कार्यालयामार्फत मौजा ईमानपूर येथे मोजणी सुरू असलेल्या शेतात भेट देऊन प्रत्यक्ष मोजणीची पाहणी केली. त्यानंतर भक्तीधाम येथे गीता जयंतीनिमित्त सुरू असलेल्या ज्ञान यज्ञ सप्ताहला भेट देत संत श्री गुलाबराव महाराजांचे दर्शन घेतले. यावेळी भक्तीधाम व्यवस्थापक मंडळीने जिल्हाधिकारी यांचा शाल श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान केला.

तहसील कार्यालयामध्ये गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, तहसीलदार यांच्या समवेत आढावा बैठक घेतली. यादरम्यान त्यांनी जलसंधारण विभागाच्या अटल भुजल योजनेच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उदघाटन केले. अवकाळी पावसामुळे आसेगाव मंडळातील कोटगावंडी येथील पिकांच्या नुकसानीची पाहणी करत शेतकर्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

पुढे विदर्भातील प्रसिद्ध बहिरम यात्रेचे व्यवस्थापन पाहण्यासाठी बहिरम येथे पोहचले. बहिरम बाबा मंदिर विश्वस्तांसोबत चर्चा करून यात्रेतील कायदा सुव्यवस्थेची पाहणी केली. यावेळी सहाय्य जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी अचलपूर श्रीकांत उंबरकर, तहसीलदार गीतांजली गरड, पुरवठा निरीक्षक बीजेवार, तलाठी भारत पर्वतकर सुमेध सोनवणे, मंडळ अधिकारी दाते, नागले, तलाठी जोशी, खलोकार, गुलक्षे आदी मंडळी उपस्थित होती.



# जिजाऊ सहकार पॅनलचे पोर्णिमा सवाई यांच्याहस्ते थाटात उद्घाटन

## जिजाऊ बँकेचा कोणताही कागद सभासदांसाठी सदैव उपलब्ध

### अविनाश कोठाळेंनी विरोधकांचे आरोप फेटाळले



**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** जिजाऊ कमर्शियँल को-ऑपरेटीव्ह बँकेने दिलेले कर्ज, ठेवी सर्व सुरक्षित असून विरोधकांकडून करण्यात आलेले आरोप हे बिनबुडाचे आहेत, असा घनाघात जिजाऊ सहकार पॅनलचे अविनाश कोठाळे यांनी करत बँकेतील सर्व दस्तावेज सभासद, मतदारांसाठी पाहण्याकरिता उपलब्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शुक्रवारी स्थानिक अभियंता भवन येथे पोर्णिमाताई सवाई यांच्याहस्ते जिजाऊ सहकार पँनलचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्र शासनाच्या प्रतिष्ठतेच्या जिजाऊ पुरस्कार तथा कृषी व सामाजिक क्षेत्रातील विविध २१पुरस्काराने सन्मानित केलेल्या सवाईताईनी पारदर्शक व सत्याचा बाजुची घेणारे व गाव तेथे ऊद्योग या संकल्पनेची मुहुर्तमेढ करणार्या जिजाऊ सहकार पॅनलच्या विजयासाठी शुभेच्छा दिल्या.

माजी खासदार अनंतराव गुढे बँकेच्या स्थापनेपासून सोबत असुन प्रामाणिकपणे काम करणारे अभियंता अविनाश कोठाळे व राजेंद्र जाधव यांची मराठी माणसांनि निर्माण केलेली बहुजनांच्या बँकेकरीता दोघांचेही समर्पन व काम करण्याची व समाजाला आर्थिक संपन्न करण्याचे राजकारणविरहित स्वप्न आवडल्यानेच कार्यक्रमाला हजर असल्याचे सांगितले.अमरावतीत नागरी सहकार क्षेत्रात ऊत्तुंग जिजाऊ बँकेने भरारी घेतल्याने विकासासोबत मी असतो . पॅनलचे प्रमुख तथा उद्योजक राजेंद्र जाधव, एकनाथ बंड, जीवन सदार, प्रकाश विधळे, गणेश बारब्दे, वासुदेव बुरंगे, उमेदवार बबन आवारे, संजय कोल्हे, प्रदीप चौधरी, श्रीकांत टेकाडे, नितीन डहाके, सुरेंद्र दाळू, सुभाष देशमुख, अनिल बंड, गौरव विधळे, स्वप्निल वावरे, विनोद कोरडे, सुनिल चाफले, पल्लवी बारब्दे, सुरेखा लुंगारे यांच्यासह अन्य मान्यवर विचारपीठावर उपस्थित होते.

दरम्यान बोलताना अविनाश कोठाळे म्हणाले, बँकेद्वारे सामाजिकि ऋण फेडण्याचा प्रयत्न सुरु आहे. बहुजन समाजात उद्योजक निर्माण व्हावे, महिलांना पाठबळ मिळावे, तरूणाईला ऊद्योजक निर्माणाचे प्रोत्साहन देण्यासाठी आम्ही सक्षमपणे प्रयत्न करत आहोत. आगामी पाच वर्षांचे व्हिजन जिजाऊ सहकार पँनलकडे असून पाच वर्षात २० शाखा उघडायच्या आहेत. समुहाला ७ कोटी रुपयांचे कर्ज वितरण करण्याचा माणस आहे. विरोधकांकडून अत्यंत घृणास्पद राजकारण सुरू असून राष्ट्रमाता जिजाऊंच्या नावे असलेल्या ऊत्कृष्ठ बँकेला व बहुजन हिताय समाजाला आर्थिक संपन्न करणार्यांना बदनाम करण्याचा विरोधकांचा प्रयत्न आहे.

हा निंदनीय प्रकार हाणुन पाडण्यासाठीच आणी बँकेच्या उत्कर्षांसाठी जिजाऊ सहकार पँनलला निवडूण देण्याचे आवाहन त्यांनी केले. बँकेने उद्योजक, कंत्राटदार, बांधकाम व्यवसायिक, महिला बचत गट,पोल्ट्री, विविध संस्थांना मदत केल्याने त्यांच्या जीवनात अभुतपूर्व बदल झाले आहे. ही बँकेची खरी ताकद आहे. त्यामुळे, बँकेतील सर्व ठेवी सुरक्षित असून कुठेही गैरव्यवहार नाही. दोन वर्षांत बँक फायनान्शिअल साऊंडअसुन ठइख नियमानुसार नविन शाखा ऊघडण्यास पात्र आहे.तसेच बँकेतील सर्व कागद सभासदांसाठी पाहण्याकरिता कधीही उपलब्ध असल्याचेही संस्थापक तथाअध्यक्ष अविनाश कोठाळे यांनी जाहीर केले.

कार्यक्रमाचे आभार डॉ गौरव विधळे यांनी मानले.याप्रसंगी एकनाथराव बंड यांनी जी बँक दरवर्षीच नफ्यामधे असल्यानेच ला भांश वाटणे हेच प्रगतीचे लक्षण असून बँकेचा सीआरएआर भागभांडवल जोखीम पर्याप्तता ही १७.९७% असल्याने १००%सुरक्षित असल्यानेच ठेवी निरंतर वाढुन ३७५कोटीच्या पुढे आहे. बँकेच्या तक्रारी करणारे स्वार्थी प्रतीपक्षी ४संचालक व त्यांचेसमवेत असलेले मसेस पदाधिकारी शहरातील प्रतिष्ठीत आमदारांनी दिलेला निवडणुकीचा समझोता प्रस्ताव अमान्य करतात हेच सहकार न वृद्धिंगत करण्याचे षडयंत्र करतात हे जिजाऊच्या सभासदांना शोभत नसल्याचे शल्य वासुदेव बुरंगे यांनी प्रतिपादन केले.

## महिला-बालकल्याण उपायुक्तालयावर धडकणार अंगणवाडी सेविका

### सिटूचा उद्याला महामोर्चा

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** राज्यभरातील सुमारे २ लाख २५ हज़ार अंगणवाड़ी कर्मचारी प्रलंबित न्याय्य-मागण्यांसाठी गेल्या २० दिवसांपासून बेमुदत संपावर आहेत. परिणामी राज्यातील कुपोषित वितरण बंद आहे; लहान मुलांचे शिक्षण बंद आहे तरी शासनाला जाग आलेली नाही, असे सांगत शासनाला जागे करण्यासाठी येत्या मंगळवारी सिटूचा महामोर्चा आयोजित करण्यात आला आहे. अंगणवाडी सेविकांचा हा महामोर्चा महिला-बालकल्याण उपायुक्तालयावर धडकणार असल्याचे सिटूतर्फे सांगण्यात आले आहे. सर्वोच्च न्यालयालयाने दिलेल्या आदेशाप्रमाणे सर्व अंगणवाडी कर्मचाऱ्यांना ग्रॅज्युईटी देण्यात यावी, अंगणवाड़ी कर्मचारी सेविकांना किमान २६ हजार व



मदतनिसाना १८ हज़ार मानधन देण्यात यावे. त्यांना दर सहा महिन्यानी महंगाई निर्देशांकानुसार महागाई भत्ता उद्या महामोर्चा देण्यात यावा. सरकारी कर्मचाऱ्यांचा दर्जा मिळावा, पेंशन योजना लागू करावी, अंगणवाड़ीला - आहार पुरवठा करणाऱ्या बचत गटांना ८ रूपये यूनिट हा दर अत्यल्प आहे. तो दर सर्वसामान्य बालकांसाठी १८ रुपये व कुपोषित बालकांसाठी २४ रूपये देण्यात यावा, या मागण्यासाठी या महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

## २७ डिसेंबर ला शेकडो युवक होणार सायकलने शेगाव रवाना

### रविराज देशमुख मित्र परिवाराचे आयोजन

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** सुंदरलाल चौक येथून बुधवारी (ता. २७ डिसेंबर) सकाळी साडेनऊ वाजता श्री संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान या राष्ट्रीय संदेशाची जनजागृती करण्याकरीता अमरावती । ते शेगाव अशी सायकल तीर्थयात्रा आयोजिण्यात आलेली आहे. १५० भक्त सायकलने शेगाव करिता रवाना होतील.भाजपा प्रदेश उपाध्यक्ष रविराज देशमुख मित्र परिवाराने या कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे. मेजर राजेंद्रसिंग बघेल यांच्या नेतृत्वात आयोजित यात्रेला आमदार व भाजपा शहर जिल्हाध्यक्ष प्रवीण पोटे हिरवी झेंडे दाखवणार आहेत. यावेळी



आमदार पोटे यांच्यासह पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, अप्पर पोलीस अधीक्षक विक्रम साळी, पिठाधीश्वर शक्ति महाराज, भाजपचे माजी शहराध्यक्ष किरण पातुरकर, तुषार भारतीय, होमगार्ड केंद्रनायक दीपक राजपूत, किन्नरआघाडीच्या आम्रपाली चौधरी उपस्थित राहतील. या तीर्थयात्रेकरिता राजेंद्रसिंग बघेल यांच्यासह चेतन हरणे, पंकज निखार, राहुल पाल, पप्पू पाली, राजू चौधरी, जवाहर पाली, भारत शिंगाडे, प्रदीप बदरे, हंसराज येंडे, पृथ्वीराज चव्हाण, विक्रम सिंग बघेल, नयनसिंह परिहार, खुशाल सिंह बघेल, रितिक पाली, विश्वजीत सिंह ठाकूर, ललित सिंह ठाकूर, नरेंद्र सिंह ठाकूर, देवराज सिंह ठाकूर, रणवीर सिंह ठाकूर, रागिनी पुंड, हरिओम महाराज सोनी, श्रीकांत सगणे, अर्जुन टांगे सहभागी होतील. ही सायकल तीर्थयात्रा सुंदरलाल चौक येथून दीडशे किलोमीटर शेगावला रवाना होईल. वलगाव, दर्यापूर, दहीहंडा, निंबा मार्गाने शेगाव येथे पोहोचणार असून या तीर्थयात्रेमध्ये सहभागी १५० भाविक भक्तांचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात येईल.

## सुनील केदारांचा एमआरआय नॉर्मल

## सीटी अँजिओग्राफीसाठी लागणार वेळ!

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक नागपूर :** मेडिकलच्या आयसीयूमध्ये भरती असलेले माजी मंत्री सुनील केदारांचा एमआरआयचा अहवाल रविवारी नॉर्मल आला. परंतु क्रिएटीनीन वाढल्याने 'सीटी अँजिओग्राफी' पुढे ढकलण्यात आली. या तपासणीचा अहवाल 'नॉर्मल' आल्यावरच त्यांची मेडिकलमधून सुटी होण्याची शक्यता आहे.



जिल्हा बँक रोखे घोटाळ्याप्रकरणी न्यायालयाने केदार यांना पाच वर्षांची कारवासाची शिक्षा सुनावल्यानंतर शुक्रवारी वैद्यकीय तपासणीसाठी त्यांना मेडिकलमध्ये आणण्यात आले. येथे त्यांना घशाचा संसर्ग, मायग्रेनचा त्रास असल्याचे आणि ईसीजीमध्ये 'हार्ट रेट' कमी असल्याचे आढळून आले. त्यांना वॉर्ड क्र.५२ या अतिदक्षता विभागात भरती करण्यात आले.

शनिवारी सुपर स्पेशालिट हॉस्पिटलच्या हृदयरोग तज्ज्ञानी त्यांची तपासणी करून सीटी अँजिओग्राफीचा सल्ला दिला. रविवार सुटीचा दिवस असतानाही ही तपासणी होणार होती. परंतु त्यापूर्वी करण्यात येणाऱ्या तपासणीत क्रिएटीनीन वाढल्याचे आढळून आले. यामुळे ही तपासणी पढे ढकलण्यात आली. मायग्रेनचा निदानासाठी त्यांचा एमआरआय करण्यात आला असता, तो नॉर्मल आला.

'एक्स-रे'मध्ये त्यांच्या छातीत कफ असल्याचेही दिसून आले. यामुळे रविवारची रात्रही त्यांची मेडिकलमध्ये गेली. एकूणच मेडिकल प्रशासन शक्य तितक्या लवकरच विविध तपासण्या, आजाराचे निदान व उपचार करून त्यांना सुटी देण्याचा प्रयत्नात असल्याचे चित्र आहे.

### आमदारकीही गमावली!


काँग्रेस नेते आणि माजी मंत्री सुनील केदार यांना दुसरा मोठा धक्का बसला आहे. नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत झालेल्या १५० कोटी रुपयांच्या सरकारी रोखे खरेदी घोटाळा प्रकरणी मुख्य आरोपी असलेल्या सुनील केदार यांना न्यायालयाने पाच वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावल्यानंतर आता त्यांची आमदारकीही रद्द करण्यात आली आहे.लोकप्रतिनिधी कायद्यान्वये आमदार किंवा खासदारांना दोन किंवा त्यापेक्षा जास्त वर्षांची शिक्षा झाल्यास त्यांचे सदस्यत्व तत्काळ रद्द करण्यात येते. त्यामुळे आता केदार यांची आमदारकी रद्द करण्यात आली आहे. नागपूर जिल्ह्यातील सावनेरचे ते आमदार आहेत. त्यांच्या दोषसिद्धीला वरिष्ठ न्यायालयात स्थगिती मिळाली तरच त्यांचे सदस्यत्व पुन्हा बहाल होऊ शकते.

## डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या सन्मानार्थ भारत सरकार जारी करणार १२५ रुपयांचे नाणे

*__दि.२५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –__ भारताचे पहिले कृषिमंत्री डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या सन्मानार्थ भारत सरकार १२५ रुपयांचे नाणे जारी करणार आहे. त्या संदर्भातील राजपत्र प्रसिद्ध झाल्याची माहिती श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी दिली.*

*कृषी व शैक्षणिक क्षेत्रात क्रांती घडवून आणण्याचे काम श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व भारताचे पहिले कृषिमंत्री डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी केले असून येत्या २७ डिसेंबर रोजी त्यांची १२५जयंती साजरी होणार आहे. या १२५ व्या जयंती उत्सवाच्या निमित्ताने भाऊसाहेबांच्या सन्मानार्थ भारत सरकारच्या अर्थ मंत्रालयाने १२५ रुपयांचे नाणे जारी करण्याचा निर्णय घेतला असून त्या संदर्भातील अधिसूचना असणारे राजपत्र २१ डिसेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात आले आहे.*



*केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी भाऊसाहेबांच्या सन्मानार्थ नाणे जारी व्हावे यासाठी विशेष पुढाकार घेतल्याची माहिती अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी दिली. १२५ व्या जयंतीनिमित्त १२५ रुपयांचे नाणे जारी होणे हे भाऊसाहेब देशमुख व त्यांच्या कार्याचा सन्मान असून ही बाब आपल्या सर्वांसाठी अभिमानास्पद आणि भूषणावह असल्याचे हर्षवर्धन देशमुख यांनी म्हटले आहे.*

## मनसे अध्यक्ष राज ठाकरे अमरावतीत



**अमरावती** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आज सोमवार २५ डिसेंबर रोजी अमरावतीत सकाळी ८ वाजता आगमन झाले . पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांकडून स्वागत स्विकारल्यानंतर ते थेट शहरातील महफिल ईन हॉटेलक वर पोहचले या ठिकाणी कार्यकर्त्यांनी त्यांचे ढोल ताशे फटाके फोडून जलोषात स्वागत केले. सकाळी ११.३० वाजता जुना बायपास रस्त्यावरील हॉटेल प्राईम पार्क येथे असलेल्या प्रख्यात चित्रकार तसेच राज ठाकरे यांचे मित्र विजय राऊत यांच्या मुलीच्या विवाह सोहळ्यास उपस्थित राहतील. विवाह सोहळ्यानंतर पक्षाच्या महत्त्वाच्या प्रमुख पदाधिकार्यांची ते बैठक घेण्याची शक्यता आहे. त्यानंतर दुपारी अमरावती येथील बेलोरा विमानतळावरून ते मुंबईकडे रवाना होतील.

## शंकरबाबाच्या आश्रमाला शरद पवार देणार भेट

### अनिल देशमुखांनी घेतला पुढाकार

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** शरद पवार २७ व २८ डिसेंबर या दोन दिवसासाठी अमरावती जिल्हाच्या दौऱ्यावर येणार आहे. याच दौऱ्यादरम्यान परतवाडा तालुक्यातील वझ्झर येथील शंकरबाबा पापळकर आश्रमास भेट देण्यासाठी अनिल देशमुख यांनी शरद पवार यांना पत्र दिले होते. त्यांची ही विनंती पवार यांनी स्विकारली असून ते २८ डिसेंबरला भेट देणार असल्याची माहिती अनिल देशमुख यांनी दिली आहे. शरद पवार हे दोन दिवसांचा अमरावती जिल्हाच्या दौऱ्यावर येत आहे. २७ डिसेंबरला ते विशेष विमानाने सकाळी ११ वाजता अमरावती येथे येतील.

यानंतर ते विश्राम गृहात कार्यकर्त्यांच्या भेटी गाठी घेवून शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने पंजाबराव देशमुख यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त आयोजीत कार्यक्रमास दुपारी ४.३० वाजता उपस्थीत राहतील. यानंतर त्यांचा अमवराती येथेच मुक्काम असेल. २८ डिसेंबरलासकाळी १०.४५ वाजता वझ्झर येथील शंकरबाबा




पापळकर यांच्या आश्रमास भेट देवून तेथील संपुर्ण कार्य व माहिती जावुन घेतील. नंतर दुपारी १२.०० वाजता उपतखेडा येथे आदिवासी संमेलनास उपस्थीत राहणार आहे.यानंतर अमवराती येथे सायंकाळी पाच वाजता परत येवून विशेष विमानाने मुंबईकडे रवाना होणार असल्याची माहिती अनिल देशमुख यांनी दिली. गाडगे बाबांचे विनम्र पाईक आणि अनाथांचे नाथ म्हणून ख्यातकीर्त असलेले शंकरबाबा पापळकर यांच्या आश्रमास शरद पवार साहेब यांनी भेट द्यावी अशी अनेक दिवसांपासुन अनिल देशमुख यांची ईच्छा होती. परंतु योग जुळुन येत नव्हता. दरम्यान विविध कार्यक्रमासाठी शरद पवार साहेब हे अमरावती जिल्हाच्या दौऱ्यावर येत असल्याने तो योग जुळवुन आनण्यासाठी अनिल देशमुख यांनी थेट शरद पवार साहेब यांना पत्र लिहुन भेट देण्याची विनंती केली होती हे विशेष.

## ब्राह्मणांना आरक्षण नाही, हे परमेश्वराचे मोठे उपकार

### केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांचे मोठे विधान

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक मुंबई** ब्राह्मणांना कोणतंही आरक्षण नाही, हे परमेश्वराचे खूप मोठे उपकार आहेत. त्यामुळे आता ब्राह्मण समाजातील लोक व्यवसाय करतात. वडापावचं दुकान टाकत आहेत. सलून टाकत आहेत. पुण्यातील प्रत्येक घरातील मुलगा अमेरिकेत गेला आहे, असं केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितलं. तुमची इच्छाशक्ती असेल तर कामे होतात. अडचणी असतातच. पण त्यातूनही मार्ग काढला पाहिजे, असा सल्लाही गडकरी यांनी दिला.




केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी त्यांनी वेगवेगळ्या विषयांवर मते मांडली. मला सात डॉक्टरेट मिळाल्या. पण मी नावापुढे डॉक्टर नाही लावत. मी दहावीला होतो. तेव्हा एमर्जन्सी लागली. त्या आंदोलनात मी होतो. मला दहावीत ५२ टक्के मार्क मिळाले. सायन्समध्ये ४९ टक्के मिळाले. माझ्या बहिणीचे मिस्टर सायंटिस्ट होते. आमच्या घरीही शिकलेली मंडळी होते. त्यावेळी माझी लाईन ठिक नाही असं घरच्यांना वाटायचं. तेव्हा, मी नोकरी मागणारा नाही तर नोकरी देणारा होईल, असं सांगायचो. तेव्हा घरचे हसायचे.आपल्याकडे बँकेत किंवा शिक्षकाची नोकरी करतात. परमेश्वराने ब्राह्मणांवर खूप मोठे उपकार केले. त्यांना कोणत्याही प्रकारचं आरक्षण नाही. त्यामुळे ते वडापावचं दुकान टाकत आहेत. सलून टाकत आहे. पुण्यातील प्रत्येक घरातील मुलगा अमेरिकेत गेलाय, असं नितीन गडकरी म्हणाले. समस्या आहेत. प्रॉब्लेम आहेत. काही समस्या शासकीय आहेत, काही आर्थिक आणि काही नैसर्गिक असतात. पण तुमची इच्छाशक्ती प्रामाणिक हवी. काही समस्या आपल्या रिचमध्ये आहे. काही रिचच्या बाहेर असतात. त्यामुळे आपण चालत राहिलं पाहिजे, असा सल्लाही त्यांनी दिला.

# हॅपी ख्रिसमस....



संपूर्ण जगात २५ डिसेंबर हा दिवस प्रभू येशु चा जन्म दिवस नाताळ सण (क्रिसमस) म्हणून अत्यंत उत्साहात साजरा केला जातोया पावन दिनी आज खासदार सौ नवनीत रवी राणा यांनी स्थानिक होलिक्रॉस येथील चर्च मध्ये जावून प्रार्थना केली,समस्त ख्रिस्ती बंधू भगिनींना मनपूर्वक शुभेच्छा दिल्यायावेळी आ.सुलभाताई खोडके, चर्च चे फादर रामशेन सर,फादर ओनिल गोंसांलविस,फादर अरोकिका स्यामी,फादर क्रिसलर,फादर लॉरेन्स, आईसाहेब कमलताई गवई,पोलिस आयुक्तनवीन चंद्र रेड्डी साहेब, रिपाई चे नेते डॉ राजेंद्र गवई साहेब,मौलाना गौस साहेब, उपायुक्त श्री पाटील साहेब,सहायक पोलिस आयुक्तशिवाजी बचाटे,नानकराम नेभनानी,सुरेश रतावा,युवा स्वाभिमान जिल्हाध्यक्ष जितु दुधाने,रीपाई जिल्हाध्यक्ष हिम्मत ढोले,माजी सभापती आशिष गावंडे,नरेंद्र गुलदेवकर आदी उपस्थित होते.

## धामणगावचा तरुण कोरोनाग्रस्त, आठ महिन्यांत पहिल्या रुग्णाची नोंद; नऊ नमुने तपासले




टेस्टिंग वाढविण्याच्या सूचना आरोग्य विभागाला दिल्या आहेत. नागरिकांनी दक्षता घ्यावी, संभाव्य तयारीच्या अनुषंगाने आरोग्य विभागाचे मॉकड्रील करण्यात आले आहे.

**– सौरभ कटियार, जिल्हाधिकारी**

**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

अमरावती जिल्ह्यात तब्बल आठ महिन्यानंतर एका कोरोनाग्रस्ताची नोंद झालेली आहे. २१ वर्षीय तरुण येथील सुपर स्पेशालिटी रुग्णालयात दाखल होता. त्याचा अहवाल शनिवारी पॉझिटिव्ह आल्याने जिल्ह्यात ५ मे २०२३ नंतर पहिल्यांदा कोरोना संक्रमितांची नोंद झालेली आहे.

धामणगाव तालुक्यातील हा रुग्ण आहे. अन्य आजारासाठी तो सुपरमध्ये दाखल होता. संक्रमित झाल्यानंतर त्याला कोरोना रुग्णांसाठी असलेल्या १० नंबरच्या वॉर्डात उपचारार्थ ठेवण्यात आलेले आहे. त्याची प्रवासाची पार्श्वभूमी नसली तरी त्यांच्या संपर्कातील लोकांचे नमुने घेण्यात येणार आहे. त्याला कोरोनाची फारसी लक्षणे नसल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली.जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेमार्फत नऊ नमुने तपासणीला पाठविण्यात आले होते. त्यामध्ये एक पॉझिटिव्ह नोंदविला आहे. हा नमुना आता जिनोम सिक्वेसिंगसाठी पाठविण्यात येणार आहे. त्यानंतर हा कोणता व्हेरिएंट आहे, याची माहिती मिळेल, अशी माहिती विद्यापीठ लॅबचे समन्वयक डॉ. प्रशांत ठाकरे यांनी सांगितले.

## लसणाचे दर ४०० पार, देशी लसूण झाला दुर्मीळ; सर्वसामान्यांचे बिघडले घरचे बजेट

**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

भाजीच्या चवीसाठी असलेल्या लसणाची फोडणी सध्या चांगलीच कडाडली आहे. गेल्या काही दिवसांपासून लसणाचे भाव गगनाला पोहोचले आहेत. सध्या बाजारात लसूण प्रतिकिलो २०० ते ३०० रुपये तर देशी लसूण चारशे रुपयांवर पोहोचल्यामुळे ग्राहकांना अधिकचा भार सहन करावा लागत आहे. गावरान लसूण तर चारशेच्या पार गेल्याने ग्राहकांना परवडेना अशी स्थिती आहे. हिवाळ्यात कांद्यापाठोपाठ आता लसणाचे भाव भडकले आहेत. त्यामुळे लोकांचे घरचे बजेट बिघडले आहे.



### कोठून होते आवक?

मध्य प्रदेश व गुजरातमधून लसणाची आवक होते. देशात सर्वाधिक उत्पादन मध्य प्रदेश, राजस्थान, गुजरात, ओडिशा, पंजाब, आसाम, उत्तर प्रदेशमध्ये होते. महाराष्ट्रात पुणे, नाशिक, धुळे, अहमदनगर, जळगाव, सातारा परिसरात लसणाचे उत्पादन घेतले जाते. कर्नाटकातून लसणाची आवक होत असल्याची माहिती मिळाली आहे. आवक कमी होत असल्याने भावदेखील वाढले आहेत.

टोमॅटोच्या वाढत्या किमतीमुळे सर्वसामान्यांचे बजेट कोलमडले होते. त्यातच आता लसणाला महागाईची फोडणी मिळाली आहे. लसणाचा दरही ४०० रुपये किलोच्या पुढे गेला आहे. अनेक शहरांमध्ये लसणाची किंमत ४०० रुपये प्रतिकिलोच्या जवळ पोहोचली आहे.

## निष्ठा यात्रेचे अमरावती महानगरात स्वागत

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

निहाल पांडे यांनी वर्धा ते मातोश्री पर्यंत निष्ठा यात्रेचे आयोजन केले आहे. या यात्रेत शिवसैनिक सायकलने सहभागी झाले आहे ,निष्ठा यात्रा ही आज सायंकाळी ६ वाजता स्थानिक इरविन चौक अमरावती येथे पोहोचली. यावेळी शिवसेना अमरावती महानगरप्रमुख पराग गुडधे यांनी निष्ठा यात्रेचे स्थानिय इर्विन चौक येथे स्वागत केले व सर्व शिवसैनिकांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला हारार्पण केले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख मनोजभाऊ कडू, सहकारसेना जिल्हाप्रमुख गोपालभाऊ राणे, अमरावती विधानसभा संघटक नितीन हटवार, अंजनगाव तालुका प्रमुख कपिल देशमुख, युवासेना मा.उपजिल्हाप्रमुख वैभव मोहोकार, शिवराज चौधरी, विभाग प्रमुख सचिन ठाकरे, उपविभाग प्रमुख अतुल सावरकर, मयूर गव्हाणे, अक्षय च-हाटे, ओम राणे, आदित्य ठाकरे यांच्यासह असंख्य शिवसैनिक उपस्थित होते.

## ललित पाटील प्रकरणानंतर सुनील केदारांबाबत आरोग्य विभागाचे सावध पाऊल

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

ड्रग्स प्रकरणातील आरोपी ललित पाटील याला शासकीय रुग्णालयात मिळालेल्या 'व्हीआयपी ट्रिटमेंट'मुळे विरोधकांनी आरोग्य यंत्रणा व सरकारला चांगलेच इजेक्शन टोचले होते. अशात अधिकाऱ्यांना आता यंत्रणेत असे 'व्हायरस' शिरू नये, यासाठी 'प्रिवेंटिव्ह' उपचार सुरू केले आहेत. नागपूर जिल्हा मध्यवर्ती बँक घोटाळाप्रकरणी कोर्टाने पाच वर्षांची शिक्षा सुनावलेले मुख्य आरोपी तथा माजी आमदार सुनील केदार यांच्याबाबत तर नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय वर्तुळात प्रचंड काळजी घेतली जात आहे.

राज्यातील अनेकांना 'कार्डियाक अरेस्ट' देण्यापर्यंत पोहोचलेल्या ललित पाटील प्रकरणात पुणे वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता निलंबित झालेले आहेत. अशात शिक्षण व संशोधन विभागाने शासकीय वैद्यकीय क्षेत्रासाठी सक्त मार्गदर्शन दिशानिर्देश काढले आहेत. शिक्षा सुनावलेल्या कैदी रुग्णाचा रुग्णालयातील वास्तव्याच्या कालावधीत दर तीन दिवसांनी डॉक्टरांच्या पथकाने आढावा घ्यावा, असे यात स्पष्टपणे नमूद आहे.



कैदी रुग्णाचा रुग्णालयातील कालावधी वाढवायचा असल्यास अधिष्ठात्यांना अगोदर कळवावे लागणार आहे. कैदी रुग्णास विनाकारण दीर्घ काळ रुग्णालयात दाखल केल्याचे सिद्ध झाल्यास संबंधित डॉक्टरांच्या पथक प्रमुखाला गंभीर कारवाईला सामोरे जावे लागणार आहे, असे यात म्हटले आहे. त्यामुळे सुनील केदार यांच्याबाबत नागपूर वैद्यकीय रुग्णालय प्रशासन खूपच बारकाईने पावले टाकत आहे.

डोकेदुखी आणि इतर काही तक्रारी केल्यामुळे सुनील केदार यांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील (मेडिकल) मेडिसीनच्या वॉर्ड क्रमांक ५२ मध्ये दाखल करण्यात आले आहे. सध्या ते अतिदक्षता विभागात आहेत.

केदार यांची एमआरआय चाचणी करण्यात आली. ईसीजी काढण्यात आला. इको चाचणीही करण्यात आली. रक्ताच्याही अनेक चाचण्या करण्यात आल्या आहेत. त्यांना अर्धशिशीचा बराच जुना त्रास आहे. अशात त्यांना दोन लिटर ऑक्सिजनचा बाह्यपुरवठा केला जात आहे.डोकेदुखीसह छातीत वेदना होत असल्याची तक्रारही केदार करीत आहेत. केदारांच्या ईसीजीमध्ये काही बदल डॉक्टरांना आढळले आहेत. हे बदल आधीचे आहेत की आताचे हे तपासले जात आहे. त्यानुसार गरज भासल्यास डॉक्टर 'अँजियोग्राफी' करायची की नाही, याचा निर्णय घेणार आहेत. गेल्या १० ते १५ दिवसांपासून केदार यांना सर्दी, खोकला व घशात खवखव कायम आहे. त्यामुळे त्यांची कोविड चाचणीही केली जाऊ शकते, असे सांगण्यात येत आहे.

## तापमान घसरले थंडीचा कडाका वाढला : थंडीच्या दिवसांत शेकोटीची ऊब ठरतेय दिलासादायक

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक मोर्शी**

जिल्ह्यात थंडीचा जोर काही कमी होताना दिसत नसून, उलट पारा घसरत चालला आहे. नोव्हेंबर महिन्यातील शेवटच्या आठवड्यात अवकाळी पावसाने हजेरी लावली. त्यानंतर खऱ्या अर्थाने थंडीचा जोर वाढून हिवाळ्याला सुरुवात झाल्याचा अनुभव आला. डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यातही पाऊस बरसला आणि गार वारे वाहू लागले. तेव्हापासूनच वातावरण थंडगार झाले आहे. थंडीचा कडाका वाढल्याने ग्रामीण भागात थंडीने हुडहुडी भरू लागली आहे. हवेतील गारवा वाढू लागल्याने उबदार कपड्यांचा वापर वाढला आहे. ऋतुमानानुसार प्रत्येकालाच विविध वस्तूंची गरज भासते. उन्हाळ्यात सुती वस्त्र घालणे उपयुक्त ठरते.पावसाळ्यात पावसापासून बचावासाठी छत्री, रेनकोट तर हिवाळ्यात शाल, स्वेटर, मफलर, जॅकेट, हातमोजे, पायमोजे, कानटोपी आदी उबदार कपडे वापरावे लागतात. गत काही दिवसांपासून रात्रीच्यावेळी तापमानात सातत्याने घट होत आहे. वातावरणात गारठा वाढला आहे.



सायंकाळपासूनच रस्ते ओस पडत असून, वाढत्या थंडीमुळे रात्री घराबाहेर पडणाऱ्यांची संख्या कमी झाली आहे. रस्त्यांवरील वर्दळ मंदावली असून लवकरच शुकशुकाट होत आहे.

**हुडहुडीला शेकोटीचा आधार**

ग्रामीण भागात जंगलव्याप्त परिसर असून, हिरव्या गर्द वनराईने नटलेला आहे. शहरी भागापेक्षा गावखेड्यात अधिक प्रमाणात जंगल व झाडी-झुडपे असल्याने गावखेड्यात थंडीचा जोर अधिकच आहे. 'थंडीच थंडी चोहीकडे, शेकोट्या पेटल्या सगळीकडे!' अशी स्थिती आहे. थंडीत गारव्यापासून दिलासा मिळावा, यासाठी नागरिकांनी ठिकठिकाणी शेकोट्या पेटविल्याचे दिसून येत आहे. शेकोट्यांसमोर उबदार गप्पांचा फडही रंगत आहे.

## मनसे अध्यक्ष राज ठाकरे अमरावतीत

**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आज सोमवार २५ डिसेंबर रोजी अमरावतीत सकाळी ८ वाजता आगमन झाले . पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांकडून स्वागत स्विकारल्यानंतर ते थेट शहरातील महफिल ईन हॉटेलक वर पोहचले. या ठिकाणी कार्यकर्त्यानी त्यांचे ढोल ताशे फटाके फोडून जलोषात स्वागत केले.



सकाळी ११.३० वाजता जुना बायपास रस्त्यावरील हॉटेल प्राईम पार्क येथे असलेल्या प्रख्यात चित्रकार तसेच राज ठाकरे यांचे मित्र विजय राऊत यांच्या मुलीच्या विवाह सोहळ्यास उपस्थित राहतील. विवाह सोहळ्यानंतर पक्षाच्या महत्त्वाच्या प्रमुख पदाधिकार्यांची ते बैठक घेण्याची शक्यता आहे. त्यानंतर दुपारी अमरावती येथील बेलोरा विमानतळावरून ते मुंबईकडे रवाना झालेत.

# अटल दौड हाप मॅरेथॉन राज्यस्तरीय स्पर्धेत हजारो अमरावतीकर धावले

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न स्वर्गवासी अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीच्या निमित्ताने आज अमरावती शहरात गुरुकुल बहुउद्देशीय शिक्षण संस्था व अमरावती जिल्हा अथलेटिक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय हाप मॅरेथॉन स्पर्धाच आयोजन करण्यात आले होते.सकाळी ५:४५ वा या स्पर्धेला सुरुवात करण्यात आली त्यावेळी हजारो स्पर्धक आज अमरावतीच्या रस्तावरुन धावलेत.



## ४३८३ स्पर्धकांचा नोंदविला सहभाग

अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीच्या निमित्ताने राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन अटल दौड स्पर्धा आयोजित करण्यात आली होती शहरातील नेहरू मैदानावरून या स्पर्धेला सकाळी पावणे सहा वाजता सुरुवात झाली. राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन अटल स्पर्धेचे उद्घाटन आ प्रवीण पोटे , खा डॉ अनिल बोंडे , आ प्रताप अडसड , किरण पातूरकर , रवी खांडेकर , सौ निवेदिता चौधरी , सौ किरण महल्ले , जयंत डेहनकर , शिवराय कुलकर्णी , डॉ नितीन धांडे , रवी कोल्हे सह विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते भगवा झेंडा दाखवीत सुरुवात झाली.या स्पर्धेत संपुर्ण राज्यभरातून स्पर्धक सहभागी जले होते.

राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन अटल दौड स्पर्धा नेहरू मैदान येथून प्रारंभ होऊन राजकमल चौक , राजापेठ , कल्याण नगर , मोती नगर , राजेंद्र कॉलनी , कॉंग्रेस नगर , हॅलो कॉर्नर जिल्हाधिकारी कार्यालय , पंचवटी चौक , शेगाव नाका , विलास नगर , जुना कॉटन मार्केट , जयस्तंभ , जवाहर गेट , गांधी चौक , गौरक्षण चौक , भूतेश्वर चौक , रवीनगर , नवाथे चौक , राजापेठ , राजकमल आणि समारोप नेहरू मैदान होणार आहे .हि स्पर्धा १४,१६,२०,४० व खुल्या वर्गासाठी घेण्यात आल्यात.

राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन अटल दौड स्पर्धा नेहरू मैदान येथून प्रारंभ होऊन राजकमल चौक , राजापेठ , कल्याण नगर , मोती नगर , राजेंद्र कॉलनी , कॉंग्रेस नगर , हॅलो कॉर्नर जिल्हाधिकारी कार्यालय , पंचवटी चौक , शेगाव नाका , विलास नगर , जुना कॉटन मार्केट , जयस्तंभ , जवाहर गेट , गांधी चौक , गौरक्षण चौक , भूतेश्वर चौक , रवीनगर , नवाथे चौक , राजापेठ , राजकमल आणि समारोप नेहरू मैदान मध्ये करण्यात आला.

राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन अटल दौड स्पर्धा यशस्वी होण्यासाठी विविध समितीचे गठन करण्यात आले होते . संयोजक, समन्वयक , तांत्रिक सहाय्यक , वेब पोर्टल , शासकीय यंत्रणा समन्वय , शहर सौंदर्यकरण, निवास व भोजन व्यवस्था, प्रचार व प्रसार करिता कार्यालय , सोशल मीडिया , मैदान व्यवस्थापन, वाहतूक व्यवस्था , मॅरेथॉन स्पर्धा दरम्यान प्रमुख चौकामध्ये स्वागत प्रमुख , नोंदणी प्रमुख , सामाजिक संस्थेसोबत समन्वयक, कायदेविषयक टीम इत्यादी अनेक प्रकारच्या समितीचे गठन करण्यात आले होते.

# बच्चू कडूंची आमदारकी रद्द झाली नाही पण...; काँग्रेसचा भाजपावर घणाघात

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

नागपूर जिल्हा बँक घोटाळ्याप्रकरणी काँग्रेसचे नेते, माजी मंत्री सुनील केदार यांना न्यायालयाने पाच वर्षांची शिक्षा सुनावल्यानंतर आपली आमदारकी गमवावी लागली आहे. काँग्रेसला हा विदर्भात मोठा धक्का मानला जात आहे. विशेष म्हणजे त्यांना शिक्षा सुनावल्याच्या दुसऱ्याचदिवशी त्यांची आमदारकी रद्द करण्यात आल्यामुळे



काँग्रेसने भाजपावर हल्लाबोल केला आहे. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी दोन आमदारांच्या नावाचा उल्लेख करत भाजपावर पक्षपातीपणाचा आरोप केला आहे.


नागपूर विशेष न्यायालयाने शुक्रवारी जिल्हा बँक घोटाळ्याप्रकरणी केदार यांना शिक्षा सुनावल्यांतर दुसऱ्याच दिवशी केदार यांचे विधानसभा सदस्यत्व रद्द करण्याची अधिसूचना विधिमंडळ सचिवालयाने प्रसिद्ध केली. केदार यांना शिक्षा सुनावण्यात आल्याच्या २२ डिसेंबर २०२३ या दिवसापासूनच आमदारकी रद्द करण्याबरोबरच त्यांचा सावनेर विधानसभा मतदारसंघही रिक्त झाल्याचेही जाहीर करण्यात आले. त्यानंतर, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी संताप व्यक्त करत भाजपला लक्ष्य केलं आहे.

बच्चू कडू यांची आमदारकी रद्द झाली नाही, सुधीर पारवे यांची आमदारकी रद्द झाली नाही. मात्र, सुनील केदार यांची आमदारकी तातडीने रद्द झाली. कारण, सुनील केदार यांनी नागपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात भाजपला उभे राहू दिले नाही. त्यामुळे त्यांना संपवण्यासाठी भाजपचे हे सर्व प्रयत्न सुरू आहेत, असा आरोपच वडेट्टीवार यांनी केला आहे. आमदार बच्चू कडू आणि सुधीर पारवे यांना शिक्षा सुनावण्यात आली, त्यावेळी स्थगिती मिळेपर्यंत त्यांची आमदारकी २४ तासांच्या आता रद्द केली नाही. पण, सुनील केदार यांची तात्काळ रद्द होते, म्हणजे भाजपाने सुनील केदार यांनी ग्रामीण भागात भाजपा न वाढवून दिल्याचा बदला घेतल्याचं वडेट्टीवार यांनी म्हटलं. तसेच, विरोधकांना आणि लोकशाही संपविण्याच्या दिशेने हे पाऊल पडत असल्याचंही ते म्हणाले.

# परीक्षेत विचारला भारत-पाक 'सीमा'रेषेचा प्रश्न; विद्यार्थ्याचं मजेशीर उत्तर व्हायरल

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक धौलपूर**

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सीमावाद जगभर परिचीत आहे. त्यामुळे, भारत आणि पाकिस्तान सीमारेषेसंदर्भात सातत्याने घडामोडी घडत असतात. अनेकदा क्वीझ कॉम्पीटिशन असेल किंवा स्पर्धा परीक्षांमध्येही या सीमावादावर, सीमारेषेसंदर्भात प्रश्न विचारले जातात. नुकतेच, एका परीक्षेत भारत-पाक बॉर्डरसंदर्भात विचारलेल्या प्रश्नावर विद्यार्थ्याने भन्नाट उत्तर दिलंय. विद्यार्थ्याची ती उत्तर पत्रिका चांगलीच व्हायरल झाली आहे. कारण, या उत्तर पत्रिकेत विद्यार्थ्याने सीमारेषेच्या प्रश्नावर पाकिस्तानमधून भारतात



Q.1 कारगिल युद्ध कब व किन-2 देशो के बीच लड़ा गया।

उ० कारगिल युद्ध 1999 मे हुआ, भारत और पाकिस्तान के बीच

Q.2 भारत व पाकिस्तान के बीच कौनसी सीमा है व लम्बाई बताओ?

उ० दोनो देशो के बीच सीमा हैदर है उसकी लम्बाई 5 फुट 6 इंच है, दोनो देशो के बीच इसको लेकर लड़ाई है।

आलेल्या सीमा हैदरचा नामोल्लेख केला आहे.

भारत आणि पाकिस्तान यांच्यात कोणती सीमा (सीमारेषा) आहे, त्या सीमेची (सीमारेषेची) लांबी किती आहे? असा प्रश्न परीक्षेत विचारण्यात आला होता. त्यावर, उत्तर देताना एका विद्यार्थ्याने चक्क सीमा हैदरची उंची किती आहे, हेच सांगितलंय. हे उत्तर पाहून नेटीझन्स चांगलीच मजा घेत आहेत. १२ वीच्या राज्यशास्त्र विषयाच्या परीक्षेत हा प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर, दोन्ही देशातील सीमा ही सीमा हैदर आहे, जिची लांबी ५ फूट ६ इंच एवढी आहे, असे उत्तर परीक्षार्थी विद्यार्थ्याने दिले आहे. सध्या सोशल मीडियावर विद्यार्थ्याच्या उत्तराचा मजकूर चांगलाच व्हायरल झाला आहे. नेटीझन्स कमेंट करुन त्यात आणखी भर टाकत आहे, मिम्स बनवून मजा घेत आहेत.

दरम्यान, व्हायरल उत्तरपत्रिका राजस्थानच्या धौलपूर जिल्ह्यातील बसेडी सरकारी शाळेच्या उच्च माध्यमिक वर्गातील आहे. उत्तर पत्रिकेवर शाळेचं नाव असून तपासणाऱ्या शिक्षकांनीही त्यास शून्य गुण दिले आहेत. मात्र, शाळेच्या मुख्याध्यापकांनी ही उत्तरपत्रिका आमच्या शाळेतील नसल्याचे म्हटले आहे. याप्रकरणी, आम्ही सर्वोतोपरी माहिती घेतली असून ही उत्तर पत्रिका आमच्या राजकीय विद्यालयातील नसल्याचं त्यांचं म्हणणं आहे.

# दीड जीबीचा फ्री डेटा ठरतोय युवकांच्या बेरोजगारीचे कारण

## सोशल मीडियाचा अतिवापर : पालकांमध्ये व्यक्त होत आहे चिंता

**अरुण जोशी**

**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

शहरी व ग्रामीण भागात एकीकडे मजूर मिळत नसतानाच दुसरीकडे अनेक तरुण कोणतेही काम न करता दिवसभर फ्री मिळणाऱ्या दीड जीबी डेटामुळे सोशल मीडियावर ॲक्टिव्ह राहात असल्याचे चित्र आहे. यामुळे बेरोजगारीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. युवाशक्ती दिवसभर मोबाइलमध्ये गुंतल्याने पालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.



शहरी भागासोबतच आता ग्रामीण भागात सोशल मीडियाचा मोठ्या प्रमाणात वापर वाढल्याचे दिसून येत आहे. विद्यार्थी व तरुण दिवसभर मोबाइलवर नेट वापरत असल्यामुळे ते बेरोजगार असल्याची जाणीवदेखील होत नाही. अँड्रॉइड मोबाइलमध्ये विविध ऑनलाइन गेम, व्हॉट्सॲप, फेसबुक व इतर वेगवेगळ्या ॲप्ससह लुडोसारखे मोबाइल खेळ कट्ट्यावर खेळताना तरुण दिसत आहेत. आजचे युग हे विज्ञान व तंत्रज्ञानाचे असून, व यासाठी इंटरनेट ही आवश्यक बाबझाली आहे. व्यवहारात पारदर्शकता यावी, म्हणून प्रत्येक व्यवहार हा ऑनलाइन झाला. मात्र, यातील चांगल्या बाबी न घेता तरुण व्हॉट्सॲप, फेसबुकच्या विळख्यात अडकले आहेत. सोशल मीडियाचा फक्त करमणुकीसाठी वापर करत असल्यामुळे पालकांतून चिंता व्यक्त केली जात आहे. सध्या अँड्रॉइड मोबाइलचे भाव गगनाला भिडले आहेत. प्रत्येकाच्या हातात मोबाइल दिसत आहे. त्यात इंटरनेट जोडल्यावर मोठ्या प्रमाणात करमणुकीच्या चित्रफिती पाहायला मिळत असल्याने त्यावर तरुण फिदा झाले आहेत.

**मोबाइल गेममध्ये अडकली तरुणाई**

मोबाइल हा सर्वसामान्यांपासून ते उच्चभ्रू सर्वांसाठीच जिव्हाळ्याचा बनला आहे आणि त्यातील गेम म्हटले तर सांगूच नका. कारण या गेमने आजच्या तरुण मंडळींचा चांगलाच गेम केला आहे. गेम मनोरंजनाचे साधन आहे. मोबाइलच्या गेमने शारीरिक कसरतीचे खेळच हद्दपार केलेत. आजकाल कुठेही मोबाइल गेम जास्त चालतो. कारण गावाकडील शहरात शिकणारे काही तरुण गेम खेळण्यासाठी गावापासून तीन किमी दूर जातात. कारण हा गेम खेळायला इंटरनेट लागते आणि गावात नेटवर्कच उपलब्ध नसते.

### शिक्षणात मदत म्हणून मोबाइल पण उपयोग वेगळाच

पाल्यांना शिक्षणात मदत व्हावी, या हेतूने पालकांनी त्यांच्या हातात मोबाइल दिला. मात्र, शिक्षणासाठी उपयोग न करता व्हॉट्सॲप ग्रुप, फेसबुकवर तासनतास वेळ घालवत आहेत. इंट-रनेटच्या अतिवापराचा त्यांच्या शिक्षणावर विपरित परिणाम होत आहे. आजच्या युगात इंटरनेट ही आवश्यक बाब आहे. तरुणांनी व्हॉट्सॲप, फेसबुक आदींवर वेळ वाया न घालवता त्याचा उपयोग शिक्षणासह करिअर किवा व्यवसाय वाढविण्यासाठी कसा करता येईल, याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

# रेल्वे गाड्यात २४ हजार ३३४ विनापरवाना फेरीवाल्यांवर कारवाई; ३ कोटींचा दंड वसूल

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती:**

मध्य रेल्वे विभागाच्या आरपीएफच्या फेरीवाला विरोधी पथकाने एप्रिल ते नोव्हेंबर २०२३ या दरम्यान धावत्या रेल्वे गाड्या, प्लॅटफार्मवर २४ हजार ३३४ विनापरवाना फेरीवाल्यांवर धडक कारवाई केली असून, ३ कोटी ५ लाखांचा दंड वसूल केला आहे.



प्रवाशांच्या सुरक्षितेतसह चांगल्या दर्जाचे खाद्य पदार्थ, पेय मिळावे, यासाठी रेल्वे सुरक्षा बल निरंतरपणे विनापरवाना फेरीवाल्यांवर कारवाई करतात.

मध्य रेल्वेच्या रेल्वे सुरक्षा बलाच्या फेरीवाला विरोधी पथकाने अनधिकृत फेरीवाले आणि रेल्वेच्या परिसरात अतिक्रमण करणाऱ्या विनापरवाना फेरीवाल्यांविरुध्द अत्यंत यशस्वी मोहीम राबवली आहे. ट्रेनमध्ये एप्रिल ते नोव्हेंबर २०२३ या कालावधीत भारतीय रेल्वे कायद्याच्या कलम १४४ अंतर्गत २४,३३९ प्रकरणे नोंदवली गेली असून २४,३३४ जणांना अटक केली आहे आणि ३ कोटी ५ लाखांचा . दंड वसूल केला आहे. फेरीवाला उपद्रव आणि बेकायदेशीर गोष्टींना आळा घालण्यासाठी कारवाई करण्यात आली आहे.

रक्तदान ही जनसामान्यांची सेवा, यालाच मानूया ईश्वरसेवा.

# जिजाऊ बँकेचे ३१ ला मतदान : १ जानेवारीला मतमोजणी

## एकूण १९ मतदान केंद्रांवर होणार मतदान

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

जिजाऊ कमर्शिअल को ऑपरेटिव्ह बँकेच्या ३१ डिसेंबर रोजी होवु घातलेल्या निवडणुकीकरीता उपनिबंधक कार्यालय सज्ज झाले असुन १९ मतदान केंद्र मतदानाकरीता निश्चित करण्यात आले आहे. यामध्ये अमरावती शहरात सर्वाधिक १२ केंद्र राहणार असुन मार्शी, दर्यापुर, अचलपुर व चांदूरबाजार येथे प्रत्येकी एक केंद्र देण्यात आले आहे. याशिवाय नागपुर, यवतमाळ आणि अकोला येथील मतदारांकडुन देखील तेथेच केंद्र देण्यात आले आहे.

जिजाऊ कमर्शिअल को ऑपरेटिव्ह बँकेच्या निवडणुकीत ३५ उमेदवार रिंगणात भाग्य आजमावत आहे. गूरूवारी या निवडणुक लढविणाऱ्या या ३५ उमेदवारांची यादी प्रसिध्द करून त्यांना चिन्हांचे वाटप करण्यात आले आहे. त्यामुळे आता उमेदवारांनी प्रचाराला सुरूवात केली आहे. प्रशासनाकडुन देखील निवडणुकीची जोरात तयारी सुरू आहे.या निवडणुकीत ६ हजार ६७६ मतदार मतदान करणार आहे. मतदार





हे जिल्हासह अकोला, यवतमाळ, नागपुर, औरंगाबाद, चंद्रपुर, पुणे मुंबई येथ देखील असल्याने त्यांना मतदानाकरीता सुविधा निर्माण व्हावी याकरीता १९ मतदान केंद्र निश्चित करण्यात आले आहे. यात सर्वाधिक ५ हजार ६४ मतदार हे शहरातील असल्याने शहरात सायन्कोर व गर्ल्स हायस्कुल या दोन शाळांमध्ये १२ मतदानकेंद्र देण्यात आले आहे. शहरात औरंगाबाद, चंद्रपुर, पुणे आणि मुंबई येथील मतदारांकरीता मतदानाची सुविधादेण्यात आली आहे. याशिवाय जिल्हाबाहेरील ५८६ मतदारांकरीता अकोला, यवतमाळ आणि नागपुर येथे प्रत्येकी एक मतदान केंद्राहणार आहे.तरमोर्शी, दर्यापुर, अचलपुर आणि चांदूरबाजार या चार तालुक्यात देखील मतदान केंद्र देण्यात आले आहे.

**रूख्मणीनगर येथे मतमोजणी**

जिजाऊ कमर्शिअल को ऑपरेटिव्ह बँकेच्या १५ संचालक पदाकरीता ३१ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. याकरीता ३५ उमेदवार रिंगणात असून १९ मतदार केंद्रांवर मतदान होणार आहे. मतमोजणी नवीन वर्षात १जानेवारीलाजानेवारीला रूख्मणीनगर येथील सुयोग मंगल कार्यालय येथे सकाळी ९ जी वाजतापासून सुरू होणार आहे. त्यानंतर लगेच निकाल घोषित केल्या जाईल.

# थंडी आहे म्हणून दारूचे वाढले चिअर्स; हृदयाची काळजी घ्या

**दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक**

अमरावतीवर्षातील इतर ऋतूंच्या तुलनेत थंडीच्या दिवसांत दारू पिण्याचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते. साधारणतः ऑक्टोबर महिन्यापासून देशी, विदेशी दारूच्या विक्रीत वाढ होण्यास सुरुवात होते. ही वाढ मार्चअखेरपर्यंत दिसून येते. दारू सेवनामुळे आरोग्यावर दुष्परिणाम होतात. थंडीत चिअर्स वाढविल्याने हृदयविकाराचा धोका वाढत जातो. त्यामुळे हृदयाची काळजी घेऊनच सर्व करणे हितावह ठरणारे आहे.



दारू विक्रीतूनही मोठ्या प्रमाणात महसूल मिळतो. मात्र, त्यासोबतच आरोग्याच्या समस्याही निर्माण होतात. शरीरावर विपरित परिणाम होवून अकाली मृत्यू होतो. तरुणपणात हृदयविकाराने जाणाऱ्यांची संख्या वाढती आहे. हे नुकसान आकड्यात भरून निघणारे नाही. त्यासाठी यापासून दूर असलेलेच बरे.

**अल्कोहोलचा हृदयावर थेट परिणाम**

थंडीमध्ये अल्कोहोल घेतल्याने अधिक नुकसान होते. अल्कोहोलिक कार्डिओमायोपॅथी हा आजार जडतो. व्हिटॅमिन कमी होते. यामुळे हृदयातील होमोसिस्टीम लेव्हल वाढून रक्तवाहिन्यात क्षार तयार होतो. पुढे हृदयाघाताचा धोका वाढतो.

**विदेशीच्या तुलनेत देशीचाच खप अधिक**

जिल्ह्यात आर्थिक दुर्बलता असल्याने विदेशीच्या तुलनेत देशीला अधिक मागणी आहे. कमी पैशात जास्त नशा यातून देशी दारू पिणाऱ्यांची संख्या वाढत आहे. इतर जिल्ह्यांमध्ये हे प्रमाण बऱ्याच अंशी सारखे असते.